रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक ३२८
www.ramprahar.com
# राम प्रहर
रविवार, १५ जून २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

माथेरान घाटात सलग दुसऱ्या आठवड्यात वाहतूक कोंडी/२
रविप्रहरमध्ये विविध विषयांवरील लेख/४
कृष्णा गोसावीने आफ्रिकेत पूर्ण केली खडतर धाव/८

## सर्वदूर पाऊस; रायगडातील उनेगाव वावे येथे ढगफुटी



**माणगाव** : राज्यात पुन्हा पावसाचा जोर वाढल्याचे शनिवारी (दि. १४) पहावयास मिळाले. अनेक ठिकाणी नदी, नाले दुथडी भरून वाहू लागले. पावसामुळे वाहतुकीवरदेखील परिणाम झाला. रायगड जिल्ह्यात जोरदार पाऊस पडला. माणगाव तालुक्यात लोणेरे विभागातील उनेगाव वावे गावात ढगफुटीसदृश्य पाऊस झाला. तेथे मुसळधार पावसामुळे पाण्याचे लोंढे वाहू लागले. सलग अर्धा तास कोसळलेल्या तुफानी पावसामुळे गावाला नदीचे स्वरूप आले. राज्याच्या इतरही भागात जोराचा पाऊस झाला. हवामान खात्याने पुढील २४ तासांसाठी मुसळधार पावसाचा इशारा दिला होता. त्यानुसार मुंबईमध्ये जोरदार पावसाला सुरुवात झाली. पावसातून वाट काढताना दिसत आहेत. यामुळे काही ठिकाणी वाहतूक धीम्या गतीने सुरू होती. ठाणे जिल्ह्याच्या अनेक भागांतही जोरदार पाऊस पडला.

# विद्यार्थ्यांचे परदेशी शिक्षणाचे स्वप्न आता भारतातच पूर्ण होणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

### पाच आंतरराष्ट्रीय विद्यापीठांना आशयपत्र प्रदान



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय विद्यार्थ्यांना आता उच्च शिक्षणासाठी जाण्याची गरज राहणार नाही, कारण आज राज्य शासनाने राष्ट्रीय शिक्षण धोरणातंर्गत पाच परदेशी विद्यापीठांना आशयपत्र प्रदान केले आहे. आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे भारतातील पहिले शैक्षणिक हब मुंबई, नवी मुंबईत उभारण्यात येत असून भविष्यात आणखी विद्यापीठांचे स्वागत करायला आम्ही तयार आहोत, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

हॉटेल ताज येथे 'मुंबई रायझिंग : क्रिएटिंग अॅन इंटरनॅशनल एज्युकेशन सिटी' या पाच जागतिक विद्यापीठांना आशयपत्र (एलओआय) प्रदान करण्याचा कार्यक्रम शनिवारी (दि. १४) झाला. त्या वेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

कार्यक्रमास केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, केंद्रीय शिक्षण सचिव तथा विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष विनित जोशी, अपर मुख्य सचिव असिमकुमार गुप्ता, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, ब्रिटनच्या उच्चायुक्त लिंडी कॅमेरॉन, ऑस्ट्रेलियाचे कॉन्सुल जनरल पॉल मर्फी, अमेरिकेचे कॉन्सुल जनरल माईक हँकी, इटलीचे कॉन्सुल जनरल वॉल्टर फेरारा, ॲबर्डीन विद्यापीठाचे उपप्राचार्य ग्लोबल एंगेजमेंट प्रा. सिलादित्य भट्टाचार्य, यॉर्क विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. चार्ली जेफ्री, वेस्टर्न ऑस्ट्रेलिया विद्यापीठ उपकुलगुरू गॉय लिटलफेअर, इलिनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष इलिनॉय टेक राज ईचंबाडी, आयईडीचे रिकार्डो बाल्बो, अधिष्ठाता, विविध विद्यापीठांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, युनिव्हर्सिटी ऑफ ॲबर्डीन (स्कॉटलंड, यु.के.), युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क (यु.के.), युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया (ऑस्ट्रेलिया), इलीनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (अमेरिका), इस्तितुतो यूरोपीओ दी डिझाईन (इटली) ही जगातील पाच नामवंत विद्यापीठे भारतात येत आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात ही विद्यापीठे उभी राहणार आहेत. याच परिसरात येत्या काही वर्षात मेडिसिटी, स्पोर्ट्स सिटी आणि इनोव्हेशन सिटी उभारण्यात येणार आहे. येथे आगामी कालावधीत १० विद्यापीठ एकत्र येतील अशी संकल्पना राबवविण्याचा विचार आहे. सध्या या पाच विद्यापीठांमुळे हा परिसर पूर्ण शिक्षण आणि संशोधनासाठी ओळखला जाईल. मुंबईची सध्या वित्तीय, औद्योगिक आणि मनोरंजन उद्योगाचे शहर म्हणून ओळख आहे. विद्यापीठामुळे एज्युकेशनल सिटी अशी ओळख होईल. विकसित भारत २०४७मध्ये हा निर्णय महत्त्वाची भूमिका बजावेल.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी अधिक माहिती देताना सांगितले की, ॲबरडीन विद्यापीठ, यॉर्क विद्यापीठ, वेस्टर्न ऑस्ट्रेलिया विद्यापीठ, इलिनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि इस्टिट्यूटो युरोपियो डी डिझाईन हे मुंबई, नवी मुंबईत पूर्ण कॅम्पस आणणार आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०शी सुसंगत अशा प्रकारचा हा पहिलाच उपक्रम नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ विकसित होत आहे. अटल सेतू निर्माण झाला आहे. पायाभूत सुविधांच्या व्यवस्था आणि आंतरराष्ट्रीय कनेक्टिव्हिटी यामुळे विद्यापीठाशी निगडित सर्वांना उपयुक्त ठरेल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे परदेशातील अनेक विद्यापीठांना भारतात येण्यासाठी उत्सुकता दाखवली आहे. ज्या भारतीय तरुणांना परदेशी जाऊन शिक्षण घेणं शक्य नाही त्यांचे स्वप्न आता अपुरे राहणार नाही. सध्या पाच विद्यापीठे आली आहेत, पण भविष्यात अजूनही विद्यापीठांचे स्वागत करायला आम्ही तयार आहोत. नुकताच वेर्स्टन युनर्व्हसिटी आणि गोंडवाना विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार झाला आहे. **(पान २ वर..)**

### *विकसित भारतासाठी नवीन शैक्षणिक धोरण हातभार लावेल –ना. धर्मेंद्र प्रधान*

*या वेळी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान म्हणाले की, प्राचीन काळापासून शिक्षण क्षेत्रात भारताचा जागतिक स्तरावर नावलौकिक राहिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामध्ये विकसित भारताचे स्वप्न साकारण्यासाठी अनेक योजना राबविल्या जात आहेत. नवीन शैक्षणिक धोरणामुळे जागतिक पातळीवरच्या विद्यापीठांनादेखील आपल्या संस्था भारतात सुरू करता येणार आहेत. त्याचबरोबर भारतातील शिक्षण संस्थांना परदेशामध्ये आपल्या शाखा उघडता येणे शक्य होणार आहे. भारतात जागतिक दर्जाचे शिक्षण विद्यार्थ्यांना कमी खर्चात उपलब्ध होईल, असेही त्यांनी सांगितले.*

## योग विथ आमदार प्रशांत ठाकूर!

### प्रबळगड माची येथे जागतिक योग दिनी विशेष कार्यक्रम




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता युवा मोर्चा पनवेलच्या वतीने यंदाही जागतिक योग दिनाचे औचित्य साधून योग विथ आमदार प्रशांत ठाकूर या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शनिवारी (दि. २१) सकाळी ६ वाजता पनवेलजवळील प्रबळगड माची या निसर्गरम्य आणि ऐतिहासिक स्थळी होणार आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही योगप्रेमींना एकत्र आणून शारीरिक व मानसिक स्वास्थ्याचा संदेश देण्यासाठी हाच उपक्रम राबवला जात आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकाराने सुरू झालेला हा उपक्रम आता एक परंपरा बनला असून आरोग्य, युवक सशक्तीकरण आणि सांस्कृतिक जतन याला वाहिलेला आहे. प्रबळगड माची, सह्याद्रीच्या कुशीत वसलेले, निसर्गाच्या सान्निध्यातील एक शांत आणि ऊर्जादायी जागा आहे. येथे योगाभ्यास करताना शरीर आणि मन दोघांनाही नवचैतन्य मिळते. ऐतिहासिक ठिकाणी योगसाधना करताना निसर्गाशी नाते जपण्याची आणि आत्मिक शांतता अनुभवण्याची संधी मिळते.

या उपक्रमात दरवर्षी शेकडो युवक, महिला, स्थानिक नागरिक तसेच विविध संघटनांचे प्रतिनिधी सहभागी होत असतात. विविध योगासने, श्वसन तंत्रे आणि ध्यानधारणा यांचे सत्र यावेळी योजित करण्यात आले असून या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे स्वतः आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती आणि सहभाग आहे, जे सदैव युवावर्गासाठी प्रेरणास्रोत राहिले आहेत.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ऑनलाईन नोंदणी फॉर्म उपलब्ध करण्यात आलेला आहे. सहभागी होण्यासाठी https://docs.google.com/forms/d/e/1F-IpQLSculcMq-BBUQhji5GuLpMrJG2uWY75XN4BkUpX671iB1enErg/viewform या लिंकवर क्लिक करून नाव नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन युवा मोर्चाच्या वतीने करण्यात आले आहे.

## नीट यूजी परीक्षेत महेश कुमार अव्वल

**मुंबई** : वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या नीट यूजी २०२५ परीक्षेचा निकाल शनिवारी (दि. १४) जाहीर करण्यात आला. या परीक्षेत राजस्थानचा महेश कुमार देशात अव्वल ठरला आहे.

मध्य प्रदेशच्या उत्कर्ष अवधियाने दुसरा आणि महाराष्ट्राच्या कृषांग जोशीने तिसरा क्रमांक मिळवला आहे. निकालासोबत टॉपर्सची यादीही जाहीर करण्यात आली आहे.

## विमान दुर्घटनेतील मृतांचा आकडा २७५वर

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

एअर इंडियाचे विमान अहमदाबादमध्ये कोसळून झालेल्या दुर्घटनेतील मृतांचा आकडा २७५पर्यंत वाढला आहे. जखमी झालेल्या आणखी काही जणांचा मृत्यू झाल्याची माहिती डॉक्टरांनी दिली.

दुर्घटनेत विमानातील २४१ प्रवाशांचा मृत्यू झाला. ज्या ठिकाणी विमान कोसळले त्या वैद्यकीय वसतिगृह येथील २४ जण मृत्युमुखी पडले. यात नऊची भर पडून संख्या ३३वर पोहचली, तर शोधपथकांना अपघातस्थळावरून आणखी एक मृतदेह आढळला. त्यामुळे एकूण मृतांचा आकडा २७५वर गेलो.

दरम्यान, विमान अपघातातील मृतांच्या नातेवाईकांना एअर इंडिया २५ लाख रुपये देणार आहे. टाटा सन्सने यापूर्वीच १ कोटी रुपये देणार असल्याची घोषणा केली होती.

## निवडक

### छत्रपती संभाजीनगरमध्ये वीज पडून चौघांचा मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर** : जिल्ह्यात शनिवारी (दि. १४) वीज पडून दोन सख्ख्या भावांसह चौघांचा मृत्यू झाला, तर चार जनावरेही दगावली. सिल्लोडच्या सारोळा गावातील यश राजू काकडे (वय १४) आणि रोहित राजू काकडे (वय २१) हे दोन सख्खे भाऊ, मोढा बुद्रुक शिवारात रंजना बापुराव शिंदे (वय ५०) आणि पिंपळदरी येथील शेतकरी शिवराज सतीश गव्हाणे (वय २८) यांचा मृत्यू झाला. त्याचा भाऊ जिवन सतीश गव्हाणे गंभीर जखमी झाला आहे. याशिवाय मांडणा, अन्वी शिवारात जनावरे मृत्युमुखी पडली आहेत.

### मुंबईत डंपरने चौघांना चिरडले; संतप्त नागरिकांचा ठिय्या

**मुंबई** : गोवंडीत शनिवारी (दि. १४) एका डंपरचालकाने चार जणांना चिरडल्याची घटना घडली. या भीषण अपघातात चौघांचाही मृत्यू झाला. घाटकोपर–मानखुर्द लिंकरोडवर शिवाजीनगर भागात हा अपघात घडला. घटनेनंतर स्थानिक जमावाने संताप व्यक्त करत डंपरचालकाला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. अपघात व नागरिकांच्या ठिय्यामुळे दोन्ही दिशेने जाणारी वाहतूक ठप्प झाली होती.

## चौल येथे अवैध वृक्षतोड

### सव्वा लाखांचा माल जप्त; चौघे ताब्यात



**रेवदंडा, अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील चौल येथील वनविभागाच्या राखीव जंगलातील अवैध वृक्षतोड उघडकीस आली आहे. वन विभागाच्या पथकाने टाकलेल्या धाडीत शिसव प्रजातीच्या लाकडाचे १४ नग आणि वाहतूक करणाऱ्या टेम्पोसह एक लाख २५ हजारांचा माल जप्त करण्यात आला असून चार जणांना ताब्यात घेण्यात आले.

चौल भोवाळे येथील दत्त मंदिर परिसरात असलेल्या वन विभागाच्या जंगलातून कुणीतरी वृक्षतोड करून त्याची वाहतूक करीत असल्याची माहिती वन विभागाला मिळाली होती. त्यानुसार वन विभागाच्या पथकाने रात्रीच्या वेळी तिथे धाड टाकून तिघांना ताब्यात घेतले. सरकारी जंगलातून वृक्षतोड केल्याची कबुली त्यांनी दिली. या प्रकरणी मनोज खारकर, राकेश भोईर, अजय शेळके तसेच खरेदीदार माधव बापट यांना चौकशीसाठी ताब्यात घेऊन सात नग जंगलातून आणि सात नग बापट यांच्या अंगणातून असे १४ नग शिसवाचे लाकूड पथकाने जप्त केले. आरोपींविरोधात भारतीय वन अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यातील आरोपी मनोज खारकर याचा माड तोडण्याचा व्यवसाय असून बऱ्याच वेळा तो मालकी क्षेत्रात प्रतिबंधित वृक्ष अवैधरित्या तोडून त्याची विक्री करीत असे. यात त्याचा साथीदार राकेश भोईर हा मालकी किंवा सरकारी जागेतील झाडे मागणी असल्याप्रमाणे शोधून खारकर याला माहिती देत असे, तर अजय शेळके त्याच्या वाहनातून वाहतूक करीत असे. वन विभागाचे पथक बरेच दिवस त्यांचा माग काढत होते. **(पान २ वर..)**




## उरण एसटी आगारात नवीन पाच बस दाखल

### आमदार महेश बालदी यांची उपस्थिती

**उरण : रामप्रहर वृत्त**

सर्वसामान्य नागरिकांचा प्रवास सुखकर करण्यासाठी उरणचे आमदार महेश बालदी यांच्या पुढाकाराने येथील एसटी आगारात नवीन पाच बसगाड्या दाखल झाल्या आहेत. या बसगाड्यांचे उद्घाटन आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत शनिवारी (दि.१४) झाले.

या कार्यक्रमास भाजपचे उरण विधानसभा प्रमुख रवी भोईर, शहर मंडळ अध्यक्ष प्रसाद भोईर, माजी शहराध्यक्ष कौशिक शाह, माजी उपनगराध्यक्ष जयविन कोळी, युवा मोर्चा शहराध्यक्ष निलेश पाटील, भाजप तालुका सरचिटणीस कैलास भोईर, उपाध्यक्ष सुनील पाटील, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष राणी म्हात्रे, शमिता ठाकूर, एसटीचे विभागीय नियंत्रक अभिजित पाटील, अमित गिरमे, डेपो मॅनेजर गीता कोंडार, अमोल दराडे यांच्यासह चालक, वाहक, प्रवासी उपस्थित होते. या वेळी आमदार महेश बालदी व इतर मान्यवरांनी नवीन एसटी बसमधून प्रवास केला.

## दक्षिण आफ्रिका वर्ल्ड टेस्ट चॅम्पियन

### ऑस्ट्रेलियाला धूळ चारून 'चोकर्स'चा शिक्का पुसला!




**लंडन : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेची वर्षानुवर्षांची प्रतीक्षा अखेर संपली. या संघाने बलाढ्य ऑस्ट्रेलियाला नमवत वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचे जेतेपद आपल्या नावे केले आहे. एडन मारक्रमचे शानदार शतक, कर्णधार टेम्बा बावूमाचे झुंजार अर्धशतक अन् कगिसो रबाडाची भेदक गोलंदाजी यासह संपूर्ण संघाचे योगदान विजयासाठी महत्त्वपूर्ण ठरले.

ऑस्ट्रेलियाने दक्षिण आफ्रिकेला विजयासाठी २८२ धावांचे लक्ष्य दिले होते. लॉर्ड्सच्या मैदानावर ही धावसंख्या खूप मोठी होती, पण एडन मारक्रमचे शतक आणि जखमी असूनही कर्णधार टेम्बा बावूमाने अर्धशतकी खेळी करत संघाचा डाव उचलून धरला. आफ्रिकेला विजयासाठी ६ धावांची गरज असताना मारक्रम झेलबाद झाला. काईली वेरेनला संघाला एका धावेची गरज असताना चौकार लगावत संघाची आयसीसी ट्रॉफी विजयाची प्रतीक्षा संपवली. आफ्रिकेने २७ वर्षांनी आयसीसी ट्रॉफी जिंकली आहे. यापूर्वी त्यांनी १९९८मध्ये चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली होती.

**धावफलक**

ऑस्ट्रेलिया पहिला डाव सर्वबाद २१२, दुसरा डाव सर्वबाद २०७; दक्षिण आफ्रिका पहिला डाव स्कोअर सर्वबाद १३८, दुसरा डाव ५ बाद २८२.

**(अधिक वृत्त पान ८ वर..)**



**पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयातील मराठी विभागाचे पर्यवेक्षक कैलास म्हात्रे यांनी शालेय व्यवस्थापन पदविका परीक्षेत ७६.२५ टक्के, तर सहाय्यक शिक्षिका मिलन म्हात्रे यांनी ६९.३८ टक्के गुण प्राप्त केले आहेत. या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कैलास म्हात्रे आणि मिलन म्हात्रे यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

## आषाढी पालखी सोहळा पूर्वतयारी आढावा

# वारकऱ्यांसाठीच्या सुविधा तातडीने पूर्ण करा -उपमुख्यमंत्री अजित पवार

**पुणे : प्रतिनिधी**

आषाढी पालखी सोहळ्यादरम्यान वारकऱ्यांना कोणत्याही स्वरूपाचा त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी; पालखी तळ, मुक्कामाच्या ठिकाणी तसेच संपूर्ण पालखी मार्गावर आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, असे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. सोहळ्यासाठी शासनातर्फे आवश्यक निधी देण्यात येईल, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली.



पुणे विधानभवन येथे झालेल्या श्री क्षेत्र देहू व श्री क्षेत्र आळंदी पालखी सोहळा-२०२५ पूर्वतयारी आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, पुणे महानगरपालिका आयुक्त नवलकिशोर राम, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, पीएमआरडीए आयुक्त डॉ.योगेश म्हसे, पुणे, सातारा आणि सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, वरिष्ठ पोलीस अधिकारी, आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, पावसाच्या पार्श्वभूमीवर विसाव्याच्या, मुक्कामाच्या ठिकाणी आवश्यक व्यवस्था करावी. दिवे घाटात पाऊस पडत असल्यास पालखी सोहळा जाण्यास अडचण येणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. घाट परिसरात पालखीचे दृश्य पाहण्यासाठी नागरिकांना प्रतिबंध करावा. डोंगराच्या बाजूने खोदाई सुरू असल्याने पावसाने दगड रस्त्यावर येऊन वारकऱ्यांना धोका होऊ उत्पन्न होऊ नये म्हणून बॅरिकेटिंग करावे.

उंडवडी कडेपठार येथील बारामतीकडे जाणाऱ्या जुन्या तुकाराम महाराज पालखी मार्गावरील राडारोडा दूर करावा, रस्त्यावरील खड्डे भरून घ्यावेत, काम वेगाने पूर्ण करावे. इंदापूरकडे जाणाऱ्या पालखी महामार्गाचे कामाला वेग द्यावा. इंदापूर ते पंढरपूर दरम्यान पालखी महामार्गाच्या कामाला गती मिळणे आवश्यक असून पालखी जाईपर्यंत सुरक्षिततेच्या सर्व उपाययोजना कराव्यात. पीएमआरडीएच्या मेट्रोच्या कामामुळे रस्त्याच्या बाजूला असलेले बांधकाम साहित्य त्वरित बाजूला करावे.

महावितरणने संपूर्ण पालखी मार्गावर आपली अधिकारी-कर्मचाऱ्यांचे पथक सतर्क आणि कार्यरत ठेवावे. जिल्हा परिषद व नगरपालिकांनी पालखी सोहळा पुढे गेल्यावर त्वरित त्या मार्गाची, गावांची स्वच्छता करावी. मुक्कामाच्या ठिकाणी वीज व्यवस्थेसाठी संबंधित जिल्हा परिषदेने जनरेटरची व्यवस्था करावी. आवश्यकता असल्यास जनरेटरसाठी जिल्हा नियोजन समितीतून अधिकचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

विभागीय आयुक्त पुलकुंडवार यांनी करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती दिली. स्वच्छ आणि निर्मल वारीसाठी विशेष नियोजन करण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले. पोलीस आयुक्त अमितेशकुमार, विनय कुमार चौबे यांनी सुरक्षा आणि वाहतूक नियोजनाबाबत माहिती दिली. इतर उपस्थित जिल्हाधिकारी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही पालखी सोहळ्यासाठी आवश्यक सूचना तसेच केलेल्या तयारीची माहिती दिली.

# माथेरान घाटात सलग दुसऱ्या आठवड्यात वाहतूक कोंडी





**नेरळ : प्रतिनिधी**

सलग दुसऱ्या शनिवार १४ जून या आठवड्यात वीकेंडला माथेरान घाट वाहन कोंडीने फुल झाल्याने पर्यटकांना पुन्हा मनस्ताप भोगावा लागला. दरम्यान, येथे नागरिक आणि पर्यटकांच्या सहनशीलतेचा अंत झाला असून नेहमीच सुट्ट्यांच्या हंगामात माथेरान घाट रस्त्यावर प्रचंड वाहतूक कोंडीमुळे लहान मुलांना घेऊन फिरायला येणाऱ्या पर्यटकांना चढावाच्या घाटरस्त्यातून दोन ते तीन किलोमीटरची पायपीट करावी लागत आहे.

माथेरान या पर्यटनस्थळी प्रवेशद्वार जवळ दस्तुरी येथे आजतागायत सुसज्ज पार्किंगची व्यवस्था नसल्याने दरवेळी नेरळ माथेरान ह्या घाटरस्त्यात तीन ते चार किलोमीटर अंतरापर्यंत मोठया प्रमाणावर वाहनांच्या रांगा लागत आहेत. यातून मार्ग काढणे खूपच कठीण बनले. त्यामुळे नाईलाजाने पर्यटकांना आपल्या लहान लहान मुलांना वयोवृद्ध आई वडिलांना घाटरस्त्यातुन दस्तुरी नाक्यापर्यंत पायी आणावे लागत आहे.

महाराष्ट्र राज्यातील रायगड जिल्ह्यातील हे थंड हवेचे ठिकाण म्हणून एकमेव सुंदर पर्यटनस्थळ माथेरान असून याकडे शासन आणि प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे. पार्किंगची सुसज्ज व्यवस्था होऊ शकत नाही त्यामुळे महागड्या गाड्या घाटात बेभरोशे पार्क करून पर्यटकांना यावे लागते. अशीच परिस्थिती कायम राहिली तर यांचा परिणाम हा येणाऱ्या पर्यटकांच्या आणि पर्यटनावर परिणाम होणार आहे. दरम्यान, यावर नागरिकांमधून आणि पर्यटकांकडून प्रश्न उपस्थित केला जात असून संताप व्यक्त होत आहे.

**आमची गाडी घाटात लावून आम्हीजवळपास दोन किलोमीटर अंतर पहिल्यांदाच सर्वजण पायी चालत आलो. घाटात गाड्यांची खूपच गर्दी होते. चालण्याची सवय नाही त्यामुळे आमच्या वृद्ध आई वडिलांना या वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागला.**

**-धर्मेश गुप्ता, पर्यटक मुंबई**

# अलिबागेतील शिबिरात ७३ बाटल्या रक्त संकलित

**अलिबाग : प्रतिनिधी**

आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील यांच्या ७३ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ७३ बाटल्या रक्त संकलन करण्यात आले. या वेळी ७३ वृक्ष रोप वाटप करण्यात आले.

आदर्श पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील यांच्या वाढदिवसानिमित आदर्श परिवारातर्फे दरवर्षी रक्तदान शिबिर आयोजित करण्यात येते. यंदा त्यांच्या ७३व्या वाढदिवसानिमित्तदेखील संस्थेच्या मुख्य कार्यालयात, आदर्श भवन येथे रविवारी (दि.८) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ७३ रक्तदात्यांनी रक्तदान केले.



आदर्शतर्फे वर्षातून दोन वेळा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते व संकलन झालेल्या रक्ताचे जे कार्ड्स असतात ते आदर्श संस्थेत ठेवली जातात व ज्या गरजू रुग्णांना रक्ताची आवश्यकता असते त्यांना ती कार्ड्स मोफत देऊन त्याबद्दल्यात शासकीय रक्तपेढीतून मोफत रक्त पुरवले जाते.

नुकताच जागतिक पर्यावरण दिवस साजरा करण्यात आला. त्याचे औचित्य साधून सुरेश पाटील यांच्या ७३व्या वाढदिवशी ७३ जणांना फळ झाडाचे रोपांचे वाटप करण्यात आले. फळ झाडाचे रोप असल्यामुळे लोक ते आपल्या अंगणात, शेतावर किंवा परिसरात लावून त्याची निगा राखून ते वाढवतील, हा त्यामागचा हेतू आहे असे आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजित पाटील यांनी सांगितले.

रक्तदान शिबिराचे उदघाट्न झाल्यावर संस्थापक सुरेश पाटील, संचालक विलाप सरतांडेल, संचालक्त भगवान वेटकोळी यांचा वाढदिवस कर्मचारीवर्गाने साजरा केला. आदर्श पत संस्थेचे अध्यक्ष अभिजित पाटील, संचालक मंडळातील सदस्य अनंत म्हात्रे, सतीश प्रधान, ॲड. आत्माराम काटकर, विलाप सरतांडेल, भगवान वेटकोळी, महेश चव्हाण, रामभाऊ गोरीवले, ॲड. रेश्मा पाटील, ॲड. वर्षा शेठ, सनदी लेखापाल संजय राऊत आदी या वेळी उपस्थित होते.

# अखिल भजन संप्रदाय हितवर्धक मंडळाची सभा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावात अखिल भजन संप्रदाय हितवर्धक मंडळ महाराष्ट्र राज्य या नोंदणीकृत मंडळाची दक्षिण रायगड जिल्ह्याची सहविचार सभा शनिवारी (दि.१४) कुणबी भवन माणगाव याठिकाणी भजनसम्राट तथा मंडळाचे अध्यक्ष भगवान लोकरे यांच्या अध्यक्षतेखाली व सचिव प्रमोद हर्यान, उपाध्यक्ष सुनील दबके, कार्यध्यक्ष राजा दळवी, आयोजक उदय शिंदे, मंडळाचे सभासद, भजनी कलाकार यांच्या उपस्थितीत उत्साहात झाले.



या सहविचार सभेत आपल्या प्रास्ताविकपर मनोगतात मंडळाची माहिती देताना मंडळाचे सचिव प्रमोद हर्यान यांनी सांगितले की, भजनी कलाकारांनी संघटित होऊन संघटना मजबूत करणे हि काळाची गरज आहे. आपली हि संघटना नजीकच्याच काळात निश्चितच मजबूत होणार आहे. मंडळातर्फे भजनी कलाकारांची दिनदर्शिका प्रकाशित करण्यात आली असून वेगवेगळे उपक्रम मंडळातर्फे राबविण्यात येत आहेत. यासाठी भजनी कलाकारांनी वार्षिक किंवा आजीव सभासद होणे आवश्यक आहे. आपल्या कलाकारांना शासनाकडून मानधन व पेन्शन मिळाली पाहिजे. तळागाळातील भजनी कलाकारांना पुरस्कार मिळाले पाहिजेत. आपला न्याय हक्क हा आपल्या सर्व कलाकारांना मिळाला पाहिजे. आपल्या मंडळाचे जे आजीव सभासद आहेत त्यांना आपण एक ते दोन लाख रुपयांचा विमा कवच देत असतो. संघटनेचे जे प्रश्न प्रलंबित आहेत त्यासाठी सर्वांनी एकत्रित येऊन संघटित झाले तर आपल्या मंडळाच्या माध्यमातून प्रलंबित प्रश्न निश्चितच मार्गी लागतील असे सांगत सभेला उपस्थीत सर्व मान्यवर व भजनी कलाकारांचे आभार मानले.

या सहविचार सभेला अजित देशमुख, राजू दळवी,विद्याधर चोरगे, राजाभाऊ सोलम, संतोष शीतकर, विजय पायकोली आदींसह माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन, तळा, रोहा, सुधागड तालुक्यांतील भजनी कलाकार उपस्थीत होते.

# योग्य दिशा निवडूनच करिअर करा -अजित पवार

**अलिबाग : प्रतिनिधी**

मुलांच्या आवडत्या क्षेत्रात त्यांना करिअर करण्याची संधी पालकांनी देणे गरजेचे आहे. त्यांच्याशी मैत्रीचे नाते ठेवून मुलांना उभारी देणे आवश्यक आहे. आताची पिढी ही हुशार असून तंत्रज्ञानाचे ज्ञानही चांगले आहे. दहावी, बारावीनंतर विद्यार्थी महत्वाच्या टप्प्यावर आहेत. त्यामुळे दिशा चुकली तर, जीवन भरकटू शकते. विद्यार्थ्यांनी योग्य दिशा निवडून करिअर करावे, असे प्रतिपादन जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार यांनी केले.

रायगड जिल्हा फोटोग्राफर्स ॲन्ड व्हिडोओग्राफर्स असोसिएशन संलग्न अलिबाग फोटोग्राफर्स असोसिएशन व अश्वीनी टीचर्स क्लासेस अलिबाग यांच्या संयुक्त विदयमाने दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा शनिवारी (दि.१४) अलिबागमधील रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्य कार्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.



### ‘भुलभुलय्यांना बळी पडू नका’

*पालकांनी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला पाहिजे. त्यांचे मित्र बनले पाहिजे. शिक्षणाबरोबरच इतर क्षेत्राचे ज्ञान घेणे गरजेचे आहे. कोणत्याही भुलभुलय्यांना बळी पडू नका असा मोलाचा संदेश रायगड जिल्हा फोटोग्राफर्स ॲन्ड व्हीडीओग्राफर्सचे संस्थापक विवेक सुभेकर यांनी दिला.*

### विद्यार्थ्यांचा गुणगौरव

*दहावीमध्ये प्रथम क्रमांक मिळविलेले आणि दहावीमध्ये प्रथम आलेले आणि बारावी उतीर्ण झालेले अश्वीनी टीचर्स क्लासेसमधील गुणवंत विद्यार्थ्यांसह अलिबाग फोटोग्राफर्स असोसिएशनच्या सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा गुणगौरव करण्यात आला. प्रमाणपत्र, रोपटे व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.*

सामाजिक कार्यकर्ते डॉ. सचिन राऊळ, अश्वीनी टीचर्स क्लासेसच्या संचालिका अश्वीनी मेहता, रायगड जिल्हा फोटोग्राफर्स न्ड व्हीडीओग्राफर्सचे संस्थापक अध्यक्ष विवेक सुभेकर, उपाध्यक्ष समीर मालोदे, खजीनदार जितेंद्र मेहता, अलिबाग फोटोग्राफर्स असोसिएशनचे अध्यक्ष तुषार थळे, सचिव विकास पाटील, उपाध्यक्ष राकेश दर्पे, खजिनदार विवेक पाटील, कार्याध्यक्ष सुदेश माळी, सल्लागार सचिन म्हात्रे, सह खजिनदार प्रणेश म्हात्रे, अमर मढवी, विराज घरत, विजय पाटील, संदेश कवळे, वैभव शिंदे, जयराज वाघमारे, गणेश जाधव, मनोज पाटील, रवी गुंड, सुमित मालोदे, अभिजित काटकर, हरी देशमुख सर सर्व पदाधिकारी, सभासद, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

# जखमी बैलाला जीवदान

**चौक, खोपोली : प्रतिनिधी**

चौक रेल्वे स्टेशनजवळ एक जखमी बैल विशाल नरवडे यांच्या नजरेत आला, जखमी बैलाची अवस्था खूपच वाईट होती, पण सामाजिक कार्यकर्ते स्वप्नील सोनटक्के यांच्या सहकाऱ्याने उपचार करण्यात आले.



चौक रेल्वे स्टेशनचे कर्मचारी विशाल नरवडे हे चौक रेल्वे स्टेशन येथे नोकरीस आहेत, कामावरून घरी जात असताना ओमकार लॉज जवळ एक बैल रक्त बांबळ अवस्थेमध्ये दिसला, खुप मोठी जखम पोटाच्या ठिकाणी कापले होते. त्यांनी सामाजिक कार्यकर्ते स्वप्नील युवराज सोनटक्के यांना कळवले, स्वप्नील सोनटक्के यांनी पशु वैद्यकीय अधिकारी यांना भ्रमणध्वनी वरून सांगितले.

डॉ.विलास पाठक व सहकारी वैभव वाघमारे यांच्या सोबत ग्रुप ग्रामपंचायत चौक सदस्य राजीव पाटील, विशाल नरवडे, दत्ता पाटील, द्वारकानाथ खडके, चंद्रकांत दरवडा, नितीन शिंगवा, अंकुश शिंगवा, मोरु भवर यांच्या मदतीने बैलावर रात्रीत उपचार करण्यात आले. या सर्वांच्या प्रयत्नाने एका बैलाला जीवदान दिले.

# आगरी बोलीचा कार्यक्रम

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील लेखक/कवी गज आनन म्हात्रे संचलित, भूमिपुत्र सामाजिक प्रतिष्ठान नवी मुंबईनिर्मित आंग्रु डुंग्रू हा आगरी बोलीचा गौरव करणारा मजेदार कार्यक्रम आहे. गुरुवारी (दि.१९)नेरूळ, सेक्टर-१२ येथील ज्येष्ठ नागरिक भवन, पहिला माळा सभागृहात हा कार्यक्रम संध्या ५ ते ६ वेळेत सादर होणार आहे. या आंग्रु डुंग्रू कार्यक्रमात आगरी हास्य कविता, म्हणी, संवाद, वाक्प्रचार, धवला गीत, लोकगीत, आगरी बोली सादर करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवी/ लेखक गज आनन म्हात्रे हे करणार असून त्यांच्या सोबत चार कलाकार कला सादर करणार आहेत. अधिक माहितीसाठी गज आनन म्हात्रे ९३२३१७२६१५ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पान १ वरून

## विद्यार्थ्यांचे परदेशी शिक्षणाचे स्वप्न आता भारतातच पूर्ण होणार

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान म्हणाले की, मुंबई ही स्वप्नांची नगरी आहे. त्याचबरोबर ही आर्थिक राजधानीदेखील असून आगामी कालावधीत मुंबई येथे शिक्षणाचे हब होण्यासाठी परदेशी पाच विद्यापीठांचे खूप महत्त्वाचे योगदान राहील. आज भारतातील आयआयटी, आयआयएम, आयएफ, सिम्बॉयसिस यासारख्या संस्था परदेशामध्ये सुरू झाल्या आहेत. आता परदेशी विद्यापीठ भारतात येऊन शिक्षण देतील. भारताला विकसित बनवण्यासाठी आणि शिक्षण क्षेत्रात पुढे नेण्यासाठी हा निर्णय खूप महत्त्वाचा आहे. केंद्रीय शिक्षण सचिव विनित जोशी यांनी मनोगत व्यक्त केले.

अहमदाबाद विमान दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या प्रवाशांना या वेळी श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी केले, तर सूत्रसंचालन मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्यकारी अधिकारी कौस्तुभ ढवसे यांनी केले.

## चौल येथे अवैध वृक्षतोड

माधव बापट यांना त्यांच्या घरातील फर्निचरसाठी शिसवाच्या लाकडाची गरज होती. त्याची मागणी त्यांनी खारकर याच्याकडे केली होती. त्यानुसार खारकर याने काही नग पोहोचवले होते. आरोपींवर गुन्हा दाखल झाला असून त्यांची ५०० रुपयांच्या वैयक्तिक बंधपत्रावर सुटका करण्यात आली आहे.

अलिबागचे उपवनसंरक्षक राहुल पाटील, सहायक वनसंरक्षक भाऊसाहेब जवरे, वनपरिक्षेत्र अधिकारी नरेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक वनअधिकारी मौलेश तायडे, उदय हटवार, विजय पाटील, प्रभाकर भोईर, दत्ता कोळेकर व कर्मचाऱ्यांनी ही कामगिरी बजावली.



# संकष्ट चतुर्थीनिमित्त महड येथे गर्दी

**खोपोली : प्रतिनिधी**

संकष्ट चतुर्थीनिमित्त महड - अष्टविनायक क्षेत्र येथे वरद विनायकाच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. अष्टविनायक क्षेत्र महड येथील अष्टविनायक क्षेत्र वरद विनायकाच्या दर्शनासाठी भाविकांनी केलेल्या गर्दीने मुंबई-पुणे महामार्गावर मोठया प्रमाणात वाहने दिसली. दुपारी पावसाचे वातावरण निर्माण झाल्यावर गर्दी काही प्रमाणात मंदावली, मात्र संध्याकाळी भाविकांनी गर्दी झाली होती.



दर्शनासाठी आलेल्या भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून श्री क्षेत्र महड देवस्थान कमिटी व स्थानिक नागरिकांनी आप -आपल्या स्तरावर योग्य सोयी सुविधा उपलब्ध केल्या होत्या. मंदिर व्यवस्थापक राजेंद्र बडगुजर यांनी दिलेल्या माहितीनुसार पहाटेपासून दर्शनासाठी भाविकांची रांग लागली होती. दुपारपर्यंत सात ते आठ हजारांच्यावर भाविकांनी गणरायाचे दर्शन घेतले होते. संध्याकाळी पाच वाजल्यापासून दर्शनासाठी अधिक गर्दी होण्याची शक्यता असल्याने मंदिर परिसर वरदविनायक भक्तांनी फुलला होता.

# वृद्धाला लुबाडण्याचा प्रयत्न फसला

## पनवेलमध्ये तोतया पोलिसाला अटक

**पनवेल : वार्ताहर**

पोलीस असल्याची बतावणी करून वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला लुबाडण्याच्या प्रयत्नात असलेल्या दुकलीपैकी एका भामट्याला ज्येष्ठ नागरिकाने व त्याच्या मुलाने पकडून पोलिसांच्या स्वाधीन केल्याचा प्रकार पनवेलमध्ये घडला. प्रदीप बापुराव पाटील (वय ४०) असे या तोतया पोलिसाचे नाव असून पनवेल शहर पोलिसांनी त्याला अटक केली आहे. तर, पसार झालेल्या त्याच्या साथीदाराचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

शांताराम गोविंद मोरे (वय ७१) हे खांदा कॉलनीत राहतात. ते फूल मार्केट येथे जाण्यासाठी पनवेल बस स्थानकावर गेले होते. तेथे एक भामटा त्यांचा पाठलाग करत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. दरम्यान, या भामट्याने पोलीस असल्याचे सांगत शांताराम मोरे यांना रस्त्यात अडवले. त्यानंतर त्याने मोरे यांच्यावर चोरीचा संशय घेत त्यांना दमात घेण्याचा प्रयत्न करत असताना ठरल्याप्रमाणे तेथे त्याचा दुसरा साथीदार आल्यानंतर त्यानेदेखील पोलिसांचा मोठा साहेब असल्याचे सांगून मोरे यांच्याकडील ओळखपत्रे त्यांच्याकडे घेतली.

त्यानंतर या दोघांनी मोरे यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची धमकी देऊन त्यांच्याकडे ५० हजार रुपयांची मागणी करून बॉंड पेपर लिहून द्यावे लागेल, असे बजावले. मात्र, मोरे यांनी त्यांच्याकडे ५० हजार रुपये नसल्याचे सांगितले असता दोघा भामट्यांनी २५ हजार रुपये देण्यासाठी त्यांच्यावर दबाव टाकला. या वेळी मोरे यांनी युक्ती लढवत त्यांना रिक्षामधून खांदा कॉनीतील घराजवळ नेले. तेथे पोहचल्यावर मोरे यांनी त्याचा मुलगा संकत याला बोलावून घेतले. हे या दोघांच्या लक्षात येताच त्यांच्यातील एका भामट्याने तेथून पळ काढला, मात्र दुसरा भामटा त्यांच्या हाती लागला. त्याला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव प्रदीप बापुराव पाटील असल्याचे सांगितले.

त्याची अधिक चौकशी केली असता तो उडवाउडवीची उत्तरे देऊ लागला. त्यावर तो पोलीस नसल्याचे मोरे यांच्या लक्षात आल्यानंतर संकेत आणि शांताराम मोरे यांनी त्याला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले.



पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा वाढदिवस नुकताच साजरा झाला. यानिमित्त इंचगिरी सांप्रदाय देवसागर साधक समाजाचे मठाधीपती स.स.श्री. बाळासाहेब नंदेश्वर यांनी त्यांची भेट घेत वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत, रमण ठाकूर, अरुणशेठ ठाकूर, पद्माकर ठाकूर, गणेश कलकुंबे, चैतन्य लाड उपस्थित होते.

### भाजपचे अमर पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त

# उद्या मोफत आरोग्य शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पार्टीचे कळंबोली मंडल अध्यक्ष तसेच पनवेल महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती सभापती अमर अरुण पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवार १६ जून रोजी कळंबोलीत मोफत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात सिटी हॉस्पिटल, आशा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल व सुश्रुत हॉस्पिटल यांचा सहभाग आहे. या शिबिराचे उदघाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.



या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

कळंबोलीतील सेक्टर ३ मधील सिटी हॉस्पिटल येथील रुग्णालयात जनरल चेकअप, कान, नाक, घसा, डोळे व दंतरोग तपासणी, सेक्टर १६ मधील आशा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये जनरल चेकअप, कान, नाक, घसा, रक्तदाब, रक्त तपासणी, तसेच गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग तपासणी, तर सुश्रुत हॉस्पिटल येथे जनरल चेकअप, कान, नाक, घसा, आणि हाडांची तपासणी आदी तपासण्या करण्याबरोबरच औषधे मोफत दिली जाणार आहेत. या उपक्रमाचा कळंबोली व परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कळंबोली भाजप मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# केएलई कॉलेजजवळ कचरा टाकणाऱ्याला दंड

## पनवेल महापालिकेकडून कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या स्वच्छता निरीक्षकांनी केएलई कॉलेज परिसरात सातत्याने कचरा टाकणाऱ्या कळंबोलीतील रहिवासी लक्ष्मीनारायण यादव यांच्यावर कडक कारवाई केली आहे. पालिकेच्या कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष करून यादव यांनी कचरा टाकणे सुरूच ठेवले होते. अखेर त्यांच्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.



या प्रकरणी पनवेल महानगरपालिकेच्यावतीने कळंबोली पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल केली असून, नियमानुसार यादव यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ भारत अभियान महापालिका कार्यक्षेत्रात राबविले जात आहे. स्वच्छ भारत अभियानाच्या उद्दिष्टांनुसार शहरात स्वच्छता राखण्यासाठी पालिकेचे सफाई कर्मचारी सातत्याने सफाई करत असतात. या पार्श्वभूमीवर ही कारवाई अत्यंत महत्त्वाची आहे.

शहरात सार्वजनिक स्वच्छता राखण्याच्या दृष्टीने नागरिकांनी महापालिकेच्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारचा कचरा सार्वजनिक ठिकाणी न टाकता तो योग्य पद्धतीने कचरा कुंडीत टाकावा, असे आवाहन उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांनी महापालिकेच्या वतीने केले आहे.

# पनवेल परिसरातून पुन्हा ३० बांगलादेशी ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यात बेकायदेशीररित्या वास्तव्य करणाऱ्या ३० बांगलादेशीयांना पनवेल तालुका पोलिसांच्या विशेष पथकाने दोन वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या कारवाईत ताब्यात घेतले आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलींद भारंबे यांच्या आदेशानुसार मोठ्या प्रमाणात बांगलादेशीयांना शोधण्याचे काम परिमंडळ १ व परिमंडळ २ येथे सुरू असून त्या अंतर्गत पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने अशाच प्रकारच्या दोन वेगवेगळ्या कारवाईत पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वावंजे परिसरात करून तेथून २३ बांगलादेशीयांना त्याचप्रमाणे इतर ठिकाणावरून सात जणांना अशा ३० बांगलादेशीयांना ताब्यात घेऊन पुढील शासकीय कारवाई करण्यात आली आहे.

# चर्मकार आणि आदिवासी समाजाच्या विविध मागण्यांसाठी बैठक

## आमदार प्रशांत ठाकूर यांना निवेदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघरच्या रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथे जगदीश ठाकूर यांच्या पुढाकाराने आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासोबत चर्मकार आणि आदिवासी समाजाच्या विविध मागण्यांसाठी महत्त्वपूर्ण बैठक शुक्रवारी (दि.१३) झाली.

यामध्ये विशेषतः मुर्बी गावातील एक अत्यंत ज्वलंत प्रश्न म्हणजे समाज हॉल कम्युनिटी सेंटर, समाजमंदिर/कम्युनिटी सेंटरसाठी सिडको आणि पनवेल महानगरपालिका यांच्याकडे वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आला आहे तसेच यासंदर्भात सिडकोचे जेएमडी ढोले आणि सिडकोचे इतर कर्मचारी यांच्यासोबत ग्रामस्थ मंडळ मुर्बी यांच्यात बैठक झाली होती. त्या बैठकीचे इतिवृत्त मिनिट्स ऑफ मीटिंगदेखील देण्यात आल्या आहेत, परंतु सिडकोमार्फत संथगतीने कार्यवाही करण्यात येते, म्हणून ग्रामस्थ मंडळ मुर्बी यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना निवेदन देऊन सहकार्य करण्याचे विनंती केली.



याचबरोबर चर्मकार समाजाचा अत्यंत जिव्हाळ्याचा धार्मिक प्रश्न म्हणजे खारघरमधील संत रोहिदास महाराज मंदिर/कम्युनिटी सेंटरला मुख्यमंत्री महोदयांच्याकडून रीतसर परवानगी मिळावी यासाठी निवेदन देऊन सहकार्य करण्याची विनंती करण्यात आली तसेच प्रलंबित चर्मकार स्टॉल परवानासंदर्भात महानगरपालिकेकडून लवकरात लवकर निर्णय घेऊन स्टॉल परवाने मिळावे पुढाकार घ्यावा, असे निवेदन देण्यात आले.

खारघर शहरातील गोल्फ कोर्समधील दुर्लक्षित गाव म्हणजे धामोळे गाव. या गावामध्ये पाणीटंचाई होत असल्याने नवीन पाण्याची टाकी बांधण्यात यावी. तसेच ग्रामविकास भवन येथे रानभाजी आणि भाजीपाल्याचा व्यवसाय करणारे आदिवासी, कातकरी बांधव भगिनी यांना कायमस्वरूपी मार्केट उपलब्ध करून देण्यात यावे या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांना निवेदन देण्यात आले.

या बैठकीला भाजप खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेविका नेत्रा पाटील, अनिरुद्ध ठाकूर, जयगुण म्हात्रे, जनार्दन ठाकूर, आनंद नावडेकर तसेच ग्रामस्थ मंडळ मुर्बीचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ संत रोहिदास चर्मकार संघटनेचे पदाधिकारी, चर्मकार बांधव आणि धामोळे गावचे गाव कमिटी अध्यक्ष बाळाराम पारधी, भाजी मार्केट समन्वयक विद्या भगत, महिला आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी सर्व मागण्यांसंदर्भात पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. गाव कमिटी, चर्मकार संघटनेचे अध्यक्ष जगदीश ठाकूर यांनी आमदार प्रशांत ठाकूर आणि सर्व ग्रामस्थांच्या आभार मानले.

## निवडक

### मोबाईल खेचून चोरटे पळाले

**पनवेल :** कामावर जात असलेल्या इसमाच्या हातातील मोबाईल खेचून स्कुटीवरुन अज्ञात चोरटा पसार झाल्याची घटना तळोजा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. नरेश खुटारकर (वय ४७) हे नावडे येथे राहत असून, ते कामाला जाण्यासाठी सकाळी घरातून निघाले. नावडे कॉलनीतील रिक्षा स्टॅण्ड येथे पोहचले. त्यावेळी सुसाट आलेल्या काळ्या रंगाच्या स्कूटीवरील व्यक्तीने नरेश यांच्या हातातील मोबाइल खेचून नेला. याप्रकरणी तळोजा पोलिसांनी अज्ञातावर गुन्हा दाखल केला आहे.

### वाहनाची धडक; एकाचा मृत्यू

**पनवेल :** अज्ञात वाहनाच्या धडकेने एका अनोळखी व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. पनवेलकडून कर्नाळाकडे जाणाऱ्या गोवा हायवेच्या लेनवर चिंचवणगाव नजीक संग्राम हॉटेलच्या ब्रिजजवळ अपघात झाल्याची माहिती पनवेल पोलिसांना मिळाली. पोलीस घटनास्थळी गेले असता अपघातात एका ४० ते ४५ वर्षीय अनोळखी व्यक्तीचा मृत्यू झाल्याचे दिसून आले.

# महिला दक्षता समितीच्या बैठकीत मार्गदर्शन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलीस ठाण्यामध्ये महिला दक्षता समिती सदस्यांची आज बैठक पार पडून यावेळी वपोनि गजानन घाडगे यांनी विविध विषयाच्या सुरक्षेच्या अनुषंगाने उपस्थित समिती सदस्यांना मार्गदर्शन केले.



या वेळी बोलताना वपोनि गजानन घाडगे यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील अडीअडचणी, महिला-मुली यांची सुरक्षा अनुषंगाने योग्य त्या सूचना व उपाययोजना, सायबर सुरक्षा व गुन्हे प्रतिबंध, व्यसन मुक्ती व अंमली पदार्थ प्रतिबंध, आर्थिक फसवणूक व प्रतिबंधक उपाय. ज्येष्ठ नागरिक सुरक्षा व काळजी तसेच सर्व नागरिकांना नवी मुंबई पोलीस व्हाट्सअप चॅनल फॉलो करण्यास सांगितले. त्याचप्रमाणे नागरिकांचे पोलीस मदतीसाठी डायल ११२ व साइबर फ्रॉड हेल्पलाईन १९३० व कोस्टल हेल्पलाइन नंबर- १०९३ या क्रमांकाची माहिती देऊन त्याचा प्रसार नागरिकामध्ये करावा याबाबत सांगण्यात आले आहे.

बैठकीस सहा महिला दक्षता समिती सदस्य, पो नि, कांबळे, मसपोनि अर्चना कुदळे असे उपस्थित होते.

# सोन्याची चेन प्रामाणिकपणे केली परत

## पनवेल प्रभाग १८मधील स्वच्छता कर्मचाऱ्याचे कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वडाळे तलाव परिसरात सकाळी जॉगिंगसाठी येणाऱ्या एका नागरिकाची सोन्याची चेन हरवल्याची घटना घडली. प्रभाग क्रमांक १८मधील स्वच्छता कर्मचारी विश्वनाथ पाटील यांनी आपली प्रामाणिकता दाखवत ती चेन संबंधित व्यक्तीपर्यंत परत पोहचवली.



वडाळे तलाव परिसरात सकाळी स्वच्छतेचे काम करत असताना स्वच्छता कर्मचारी विश्वनाथ पाटील यांना सोन्याची चेन सापडली. त्यांनी तत्काळ ती वरिष्ठ अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली शहानिशा करून हरवलेली वस्तू संबंधित नागरिकाला परत केली. या प्रामाणिक व जबाबदार कृत्याबद्दल पाटील यांचे महापालिका प्रशासनाच्या वतीने कौतुक करण्यात येत आहे. त्यांच्या या वर्तनामुळे इतर कर्मचाऱ्यांनाही प्रोत्साहन मिळाले असून समाजात सकारात्मक संदेश गेला आहे.

# चारू मेहता वैमानिक पदावर रूजू

## मनोज भुजबळ यांच्याकडून अभिनंदन

**पनवेल : वार्ताहर**

यशोधन सोसायटी मधील एक अत्यन्त हुशार विद्यार्थिनी चारू तारक मेहता हिला तिच्या उज्वल यशाबद्दल अभिनंदन करण्याकरिता माजी नगरसेवक मनोज भुजबळ तसेच सोसायटील पदाधिकारी व ज्येष्ठ बंधू भगिनी उपस्थित होते.



डॉ. तारक मेहता आणि डॉ. धनश्री मेहता यांची कन्या असलेल्या चारूने डी. ए. व्ही. पब्लिक स्कूलच्या सीबीएसई बोर्डातून दहावीची परीक्षा ९८.० टक्के गुण मिळवून पास झाली, त्यानंतर बारावीच्या विज्ञान शाखेच्या परीक्षेत ९३ टक्के गुण मिळवले, आता तिचा प्रवास एनडीएच्या दिशेने सुरू झाला.

एनडीएच्या परीक्षेत ती मेरिट होल्डर झाली. एसएसबी सर्विस सिलेक्शन बोर्ड ऑफ इंडियाचा तिचा अत्यंत कठीण असा इंटरव्हयू एएफएसबी एरफोर्स सिलेक्शन बोर्ड डेहराडून येथे तब्बल सात दिवस झाला. हा इंटरव्हयू यशस्वीरित्या पर पाडल्यानंतर तिला पुढील प्रशिक्षणासाठी शिफारस मिळाली. पुढे नवी दिल्ली येथील एमएफसीएमई तर्फे तिला मेडिकल फिटनेस चे क्लिअरन्स मिळाले, आणि आता २१ जून २०२५ रोजी ती एनडीए खडकवासला येथे पुढील प्रशिक्षणासाठी जाणार आहे. या पुढील तिचे प्रशिक्षण तीन वर्ष पुणे येथे, तर एक वर्ष हैदराबाद येथे झाल्यावर ती वैमानिक पदावर रुजू होईल.




खारघर : जागतिक रक्तदाता दिनानिमित खारघर से. २१ येथील स्पंदन हॉस्पिटलमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत रक्तदात्यांना सन्मानित केले. या वेळी भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, विजय पाटील, संजय घरत, विपुल चौतालिया, अशोक जांगिड, प्रवीण बेरा, दीपक ठाकूर, संतोष नायर तसेच रुग्णालयाचे संचालक डॉ. संजय भिरूड, शहनवाझ सय्यद उपस्थित होते.

# ‘अप्सरा’ आज एकसष्ट वर्षांचे झाले असते...

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

मधूनच एक बातमी येते, अमूकतमूक सिंगल स्क्रीन थिएटर अर्थात एकपडदा चित्रपटगृह बंद झालेय (त्यावर पडदा पडला) आणि मागील पिढीतील अनेक चित्रपट रसिक हळहळतात, कारण त्यांचे त्या जुन्या काळातील चित्रपटगृहाशी एक भावनिक नाते घट्ट झालेले असते. अगदी बालपणापासूनच तेथे अनेक चित्रपट पाहत पाहत आयुष्य पुढे सरकलेले असते. काहींच्या बाबतीत तर आपण स्टॉल, अप्पर स्टॉल, बाल्कनी असा नेमका कोणता चित्रपट पाहिला हेदेखील मेंदूत फिट्ट असते.

असेच एक विशेष उल्लेखनीय चित्रपटगृह अप्सरा. आज ते सुरू असते तर ते एकसष्ट वर्षांचे झाले असते. मला हे अप्सरा चित्रपटगृह अनेक कारणांमुळे आवडायचे. स्मरणरंजनात रमताना त्याच्या देखणेपणापासून तेथे पाहिलेल्या अनेक चित्रपटांपर्यंत अनेक गोष्टी डोळ्यासमोर येतात.

जुन्या एकपडदा थिएटर अर्थात सिंगल स्क्रीन थिएटर्सचे प्रत्येकाचे आपले एक स्वतंत्र व्यक्तिमत्व होते अथवा आहे (जी अजूनही शिल्लक राहिली आहेत त्यांच्यासाठीही). प्रत्येक थिएटर एकापेक्षा वेगळे दिसायचे. (चित्रपट अभ्यासक्रमात हेही सांगायला हवे) त्या काळात म्हणजेच पन्नास साठ वर्षांपूर्वी फक्त चित्रपट पाहणे एवढ्यापुरतीच चित्रपटाची ओढ नसे, तर ते ओलांडून थिएटरशी नाते जुळत जाई. तेथे जाऊन अधिकाधिक चित्रपट पहावेसे वाटत. ते मेंदूत जणू नोंदवलेही जाई.

...अप्सरा चित्रपटगृह असे म्हणताक्षणीच पहिलं डोळ्यासमोर यायलाच हवं ते अतिशय चांगली आकर्षक अशी नक्षीकाम असलेली देखणी आणि ग्लॅमरस लूक असलेली भव्य वास्तू... आडव्या स्वरूपाचे चित्रपटगृह. मान उंचावून पाहत रहावी अशी वास्तू. देशात अशी देखणी एकपडदा चित्रपटगृह अनेक होती. त्यांचा इतिहास आणखी वेगळाच.

दक्षिण मुंबईतील विशेषतः धोबीतलाव, गिरगाव ते सात रस्ता आणि गिरगाव चौपाटी ते खेतवाडी/कुंभारवाडा, ताडदेव, गवालिया टॅन्क या परिसरात साठ, सत्तरच्या दशकात लहानाचे मोठे झालेल्या अगणित चित्रपट रसिकांना ही वास्तू एव्हाना आठवली असेलच. ही वास्तू डॉ. भडकमकर मार्गावरील गिल्डन लेन मैदानासमोर होती. दुर्दैवाने आज ती इतिहासजमा झाली आहे. त्याच्या कोणत्याही खाणाखुणाही दुर्दैवाने शिल्लक नाहीत. राहिल्यात फक्त आणि फक्त छान आठवणी, पण जेव्हा ती देखणी वास्तू होती तेव्हा अतिशय टुमदार अशी होती. आत शिरताच बाल्कनीकडे जाण्यासाठी तिरका परंतु पायऱ्या नसलेला जीना. आणि त्याखाली पाण्याचा हळूवार वाहता झरा. त्याचा एक लयबद्ध आवाज. संपूर्ण थिएटरला रेड कार्पेट. तुम्हीच सांगा, आपोआपच सकारात्मक मूड निर्माण होतो ना? तिकीट काढून आत शिरलो आणि सीटवर जाऊन बसलो अशी यांत्रिक गोष्ट नव्हती. सिनेमा असा मनात मुरत जायचा. त्यातील पडद्यावर चित्रपट पाहण्याचा आनंद काही वेगळाच होता तसेच तेथून एखाद्या वाहनाने



अथवा अगदी चालत जरी जायचा योग आला तरी त्या थिएटरकडे आवर्जून पाहणे होई. मला सर्वप्रथम ’अप्सरा थिएटर’ माहीत झाले ते दिलीप कुमारची भूमिका असलेल्या ’गोपी’ (१९७०) या चित्रपटामुळे! अगदी लहानपणापासून रसरंग, मार्मिक, सोबत, मनोहर, प्रभंजन अशी साप्ताहिके वाचत असताना १९७० साली दिलीप कुमारचा ’गोपी’, देव आनंदचा ’जॉनी मेरा नाम’ आणि राज कपूरचा ’मेरा नाम जोकर’ या तीन चित्रपटातील स्पर्धेबाबत जे समजेल तसे वाचत होतो. त्या वर्षी टप्प्याटप्प्याने अथवा काही आठवड्यांच्या अंतराने हे तीन चित्रपट प्रदर्शित होत गेले. आणि त्यात समजले की, ’गोपी’ चित्रपट अप्सरा थिएटरमध्ये प्रदर्शित झाला आहे. त्या काळात चित्रपट रसिकाची जडणघडण अशाही पद्धतीने होत असे. आपल्या सिनेमावेड्या देशातील हीदेखील एक महत्त्वाची गोष्ट.

मुळात अप्सरा थिएटरच्या जागी इंग्रजांच्या काळापासून लॅमिन्टन नावाचे थिएटर होते (आणि म्हणूनच हा रस्ता तेव्हापासून अगदी आजही लॅमिन्टन रोड म्हणून ओळखला जातो. नंतरचे नाव डॉ. भडकमकर मार्ग.) माझ्या अगोदरची पिढी लॅमिन्टन थिएटरची आठवण सांगताना ते फार पूर्वीच्या बसक्या थिएटरसारखे होते असे सांगतात. त्या लॅमिग्टन थिएटरमध्ये गृहस्थी, चार चांद असे अनेक चित्रपट प्रदर्शित झाले, पण कालांतराने मला वेगळी व उपयुक्त माहिती मिळाली. या लॅमिन्टन चित्रपटगृहाच्या जागी मूकपटाच्या काळात म्हणजेच विसाव्या शतकात प्रेशियस नावाचे चित्रपटगृह होते. त्यात मूकपट प्रदर्शित होत असतानाच जादूचे प्रयोग, वाद्यवृंद हेदेखील होत. त्या जागी तिसाव्या शतकात रियाल्टो





या नावाचे चित्रपटगृह उभे राहिले. त्या जागीच चाळीसच्या दशकात लॅमिन्टन हे चित्रपटगृह उभे राहिले. चित्रपटगृहाच्या इतिहासाच्या खोलात जाऊन अशी माहिती मिळवणे हेदेखील चित्रपटाचा एक प्रकारचा अभ्यासच.

लॅमिन्टन थिएटर पाडून त्या जागी १९६४ साली भव्य असे वातानुकूलित अप्सरा चित्रपटगृह उभे राहिले. बाराशे आसनक्षमता असलेल्या या अतिशय देखण्या आणि भव्य चित्रपटगृहाच्या उद्घाटनाचा पहिला चित्रपट तसाच बहुचर्चित आणि उच्च दर्जाचा असायला हवा ना? तसाच फिल्मी फंडा हवा ना? तो होता, आर.के. फिल्म बॅनरचा राज कपूर दिग्दर्शित ’संगम’. आर.के. फिल्म बॅनरचा हा पहिला रंगीत चित्रपट आहे. ’संगम’ या चित्रपटाला चक्क दोन मध्यंतरे होती आणि दोन मध्यंतरे असलेला तो आपल्याकडचा पहिला चित्रपट होता. राज कपूर, वैजयंतीमाला आणि राजेंद्रकुमार अशा प्रेम त्रिकोणाच्या थीममध्ये युरोपचे मोठ्या प्रमाणावर शूटिंग गीत, संगीत व नृत्य आणि या सगळ्याला राज कपूरचा खास दिग्दर्शनीय टच यांची केमिस्ट्री जमली होती.

’संगम’ या चित्रपटाने १८ जून १९६४ या दिवसाच्या मुहूर्तावर सकाळी १० वाजता भव्य प्रीमियरने या अप्सरा चित्रपटगृहाचे उद्घाटन झाले. या शोला चित्रपट समिक्षकांना आवर्जून आमंत्रित केले. हा पहिला शो संपल्यावर या चित्रपटगृहात खास जेवणाचा बेत होता. राज कपूर कायमच ओल्या (चिअर्स) फिल्मी पार्टी संस्कृतीसाठी नावाजला गेला, पण या वेळी श्रीखंड पुरी अतिशय चविष्ट होती असे मागील पिढीतील पत्रकार आवर्जून आठवण काढत चवीचवीनं सांगत. आपण राज कपूरचं खाल्लं अशीच एक सुप्त भावना त्यात असे. त्याचा आनंद होई.

’संगम’ने त्या काळातील सुपर हिट पिक्चरप्रमाणे अप्सरा थिएटरमध्ये पन्नास आठवड्यांचा मुक्काम केला. ’संगम’ची लांबी चार तासापेक्षा जास्त असल्याने त्याला दोन मध्यंतर होती. त्यामुळे शोच्या वेळा सकाळी ११ वाजता, साडेतीन वाजता आणि ८ वाजता अशा होत्या.

अप्सरा चित्रपटगृहाची वास्तू अतिशय प्रसन्न आणि कायमच सकारात्मक वातावरण असणारी अशी होती. तुम्ही चित्रपट पाह्यला या असे जणू ती खुणवायची. माझ्याप्रमाणेच इतरांच्याही अशाच भावना असणार. स्टॉल, अप्पर स्टॉल आणि बाल्कनी असे तीन प्रकार होते. खालच्या आणि वरच्या मजल्यावरील सिनेमाची शो कार्ड्स पाहण्यास अनेक चित्रपट रसिकांना आनंद मिळे. सिनेमा सुरु होण्यापूर्वी अशी शो कार्ड पाहणे अनेक रसिक पिढ्यांचे जणू वेड होतं. बाहेरच्या बाजूलाही डावीकडे अशी शो कार्ड्स पाहण्यास मिळत. अप्सरा थिएटरमध्ये ३, ६ आणि ९ असे दिवसा तीन खेळ असत. तसेच मॅटीनी शोला कधी जुने, तर कधी नवीन चित्रपट प्रदर्शित होत. बाह्यदर्शनी भागावरचे प्रदर्शित चित्रपटाचे पोस्टर डेकोरेशन पाहण्यात विशेष आनंद मिळे. तो काळच वेगळा होता. ते दिवसच वेगळे होते. पारंपरिक लोकप्रिय मसालेदार मनोरंजक चित्रपट व पाच दिवसाचा क्रिकेट कसोटी सामना हे सर्वसामान्यांच्या जगण्यातील मोठाच आधार असे. दक्षिण मुंबईतील जवळपास सर्वच चित्रपटगृहे ही पूर्वी मेन थिएटर होती. तेव्हाची चित्रपट






रिलीजची पारंपरिक संस्कृती. ती आज हरवली आहे आणि आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीला ती माहीत नाही, मात्र त्यांनी जुन्या काळातील चित्रपट जाणून घेताना चित्रपटगृह संस्कृतीही समजून घ्यावी.

‘अप्सरा’त अनेक चित्रपट भारी हिट ठरले. तुमसे अच्छा कौन है, शर्मिली, हीर रांझा, सफर, हसते जख्म, त्रिशूल, धर्मा (चांद दिग्दर्शित या चित्रपटातील प्राण आणि बिंदू यांच्यावरील राज की बात कहेदू तो ही कव्वाली सुरु झाली की प्रेक्षक पडद्यावर पैसे उडवत. तसे करू नका असे वृत्तपत्रातील जाहिरातीत म्हटले जाई ते बहुदा चित्रपटाच्या पब्लिसिटीचा एक फंडा असावा), प्रेम रोग, शराबी, क्रांती, संन्यासी, गोपी (दिलीप कुमार आणि सायरा बानूने लग्नानंतर पहिल्यांदा एकत्र भूमिका साकारली), त्रिशूल, युध, नाम, नूरी, बेताब, नाम वगैरे वगैरे. त्या काळात पब्लिकला पिक्चर आवडला रे आवडला की ज्युबिली हिट नक्की. सत्तरच्या दशकात अप्सरा थिएटरमध्ये स्टॉलचे तिकीट दर दोन रुपये २० पैसे, अप्पर स्टॉल तीन रुपये ३० पैसे आणि बाल्कनी तिकीट दर चार रुपये चाळीस पैसे असे होते. मनोजकुमार आणि हेमा मालिनी यांच्या प्रमुख असलेल्या सोहनलाल कंवर दिग्दर्शित ’संन्यासी’पासून ते वाढले. तोही येथे ज्युबिली हिट.

काही चित्रपटांनी ‘अप्सरा’त शंभर दिवसांचे यश संपादले. ते आहेत, शिर्डी के साईबाबा, दो अन्जाने, दुसरा आदमी, रखवाला, जानेमन, इन्साफ (ऐंशीच्या दशकात विनोद खन्नाने या चित्रपटाव्दारे केलेल्या कमबॅकला रसिकांचा असा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला की सोमवारी आगाऊ तिकीट विक्रीची खिडकी उघडण्यापूर्वीच विनोद खन्नाच्या फॅन्सची अक्षरशः प्रचंड झुंबड उडाली आणि शुक्रवारी सिनेमा रिलीज होईपर्यंत आठवड्याची तिकीटे हाऊसफुल्ल. तो ’भरलेला चार्ट’ पाहणेही एक थ्रील असे.), सौतन, खून भरी मांग वगैरे वगैरे. महेश भट्ट दिग्दर्शित ’काश’ येथे बरा चालला म्हणायचे.

काही चित्रपटांनी ‘अप्सरा’त मॅटीनी शोला यश प्राप्त केले. अमोल पालेकर यांची भूमिका असलेला बी.आर. फिल्म निर्मित आणि बासू चटर्जी दिग्दर्शित ’छोटी सी बात’ येथे मॅटीनी शोला रिलीज होताना तो एक स्वच्छ मनोरंजक चित्रपट म्हणून रिलीज झाला होता, त्यात तथ्यही आहे, पण माऊथ पब्लिसिटीवर हा चित्रपट असा काही यशस्वी ठरला की त्याने येथे २५ आठवड्यांचा मुक्काम केला. रवींद्र महाजनी यांनी भूमिका साकारलेला हिंदी चित्रपट ’बेअब्रू’नेही येथे मॅटीनी शोला रौप्यमहोत्सवी यश संपादले. रेश्मा और शेरा, अपने पराये, अगर, आंचल, रंगबिरंगी, प्यारी बहेना, जवानी, कॉल गर्ल हे येथे मॅटीनी शोला रिलीज झाले, तर आमिर खान आणि जुही चावला यांना स्टार केलेला मन्सूर खान दिग्दर्शित ’कयामत से कयामत तक’ही येथे मॅटीनी शोला रिलीज होताना पहिल्या दिवशी आवर्जून कॉलेजमधील युथला आमंत्रित केले होते. त्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादावरून हा चित्रपट सुपर हिट नक्कीच होणार असा जणू सिग्नल मिळाला. आणि पुढे काय घडले हे तुम्हाला माहिती आहेच. विशेष म्हणजे, आपण कयामत से कयामत तकच्या विशेष खेळाला अप्सरा थिएटरला कसे पोहचलो याची आमिर खान आजही एखाद्या मुलाखतीत आठवण सांगतो, पण तेव्हा त्याला अप्सरा थिएटरचे नाव आठवत नाही हो...

‘अप्सरा’त जोरदार आपटलेला पिक्चर ओ. पी. रल्हन निर्मित आणि दिग्दर्शित ’तलाश’. बलराज सहानी, राजेंद्र कुमार, शर्मिला टागोर आणि खुद्द ओ.पी. रल्हन यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाची ’एक कोटीचा चित्रपट’ अशी अगदी महागडी जाहिरात करण्यात आली होती. चौपन्न वर्षांपूर्वी एक कोटीही अक्षरक्षः प्रचंड मोठी रक्कम होती. त्या काळात मध्यमवर्गीय कुटुंबात मासिक तीनशे रुपये पगार म्हणजे खूप मोठा आनंद असे. यावरून एक कोटीची किंमत काढा. या अपयशाची बरीच चर्चा झाली. अप्सरा थिएटरमध्ये हिन्दुस्तान की कसम, ३६ घंटे, गुलाम बेगम बादशाह, द चीट, हमशकल (या चित्रपटात राजेश खन्नाची दुहेरी भूमिका आहे. तनुजा आणि मौसमी चटर्जी अशा दोन नायिका असलेल्या या चित्रपटाची गाणी आजही लोकप्रिय आहेत. या चित्रपटाची पटकथा संवाद सलिम जावेदचे आहेत, पण राजेश खन्नाने त्यात बरेच फेरफार केल्याने सलिम जावेद यांनी आपले नाव मागे घेतल्याचे त्या काळात गॉसिप्स गाजले.), अपने रंग हजार, हमारे तुम्हारे, छत्तीस घंटे, अपने रंग हजार, देशप्रेमी, विश्वनाथ, आखरी गोली, टक्कर, जोशिले ( शेखर कपूरने हा चित्रपट पूर्ण होण्यापूर्वीच दिग्दर्शन सोडले आणि निर्माते सिबते हसन रिझवी यांना हा चित्रपट पूर्ण करावा लागला),... तर मॅटीनी शोला घुंगरी की आवाज (रेखाने विजय आनंदशी वाद घातल्याने रखडवलेला चित्रपट), नौकरी (राजेश खन्नाच्या पडत्या काळातील राज कपूरसोबतचा हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित चित्रपट) असे अनेक चित्रपट आले तेच गेले.

एके दिवशी बातमी आली की ही वास्तू पाडण्यात येऊन नवीन चकाचक इमारतीत वरच्या मजल्यावर तीन मल्टीप्लेक्स स्क्रीन देणार. बदलत्या काळानुसारचा बदल.

काही महिन्यांतच नवीन इमारत उभी राहिली आणि त्यात तीन छोटे स्क्रीन आले. नवीन युगाचा हा नवीन फंडा होता, पण याला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही, तेव्हा सिनेमा थिएटरचा फिल येत नव्हता आणि काही कारणास्तव हे स्क्रीन बंदही झाले. ते सुरू होणार अशी अधूनमधून कुठून तरी बातमी येते आणि जाते.

असे करता करता अप्सरा चित्रपटगृह आठवणीत जमा झाले. आजही तेथून जाताना ती रूबाबदार वास्तू आणि त्यात आवडीने पाहिलेले आणि अधिकच आवडलेले असे छोटी सी बात, प्रेम रोग, शराबी, बेताब असे चित्रपट नक्कीच आठवतात... अप्सरा थिएटरची देखणी वास्तू आजही डोळ्यासमोर आहे. आज तेथून जाताना आपण आपले आवडते अप्सरा थिएटरच पाहतोय असा फिल येतो. खरंच एक युग सिनेमा थिएटर आवडावे असेही होते. आणि एकादी वास्तू आवडत असेल, तर स्वाभाविकच त्यातील अनेक गोष्टीही आपल्याशा वाटतात/पहाव्याशा वाटतात. आपल्या देशातील चित्रपटाचे वेड अशा मार्गानेही जाते...आणि त्याच वेडाने आपल्या देशातील चित्रपट संस्कृती घडवली.

अप्सरा चित्रपटगृह ही एक स्वतंत्र ओळख होती. मूकपटापासूनचा या मूळ वास्तूचा प्रवास होता. मुंबई बदलत बदलत गेली तशी अनेक सिंगल स्क्रीन थिएटर्स काळाच्या पडद्याआड जात राहिलीत, पण तेथील पडद्यावरचे चित्रपट त्या वास्तूची आठवण करून देतात.

---

# पत्रकार, लेखक अच्युत कोल्हटकर



मराठी पत्रकार, लेखक आणि वक्ते अच्युत बळवंत कोल्हटकर यांचा आज स्मृतिदिन. त्यांचा जन्म १ ऑगस्ट १८७९ रोजी सातारा जिल्ह्यातील वाई येथे झाला. त्यांचे वडील वामनराव कोल्हटकर हे एक वकील आणि नेमस्तपक्षीय सुधारक नेते होते. अच्युतरावांचे पालनपोषण त्यांचे चुलते बळवंतराव यांनी केल्यामुळे अच्युतराव त्यांचे नाव लावत.

अच्युत कोल्हटकर यांनी बीएएलएलबीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर सातारा आणि नागपूर येथे अनुक्रमे शिक्षक व वकील म्हणून काम केले. १९०७मध्ये देशसेवक या पत्राचे संपादक होऊन जहाल राष्ट्रवादी राजकारणात त्यांनी प्रवेश केला. त्याबरोबरच त्यांची अनेक चढउतारांनी भरलेली राजकीय आणि वृत्तपत्री कारकीर्द सुरू झाली. या कारकीर्दीत १९०८मध्ये लोकमान्य टिळकांच्या राजकारणाचा जहाल भाषेत पुरस्कार केल्याबद्दल आणि १९३०मध्ये गांधींच्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतल्याबद्दल त्यांना कारावास भोगावा लागला.

अच्युतरावांनी १९१५ साली काढलेल्या संदेश या पत्राने मराठी वृत्तपत्रसृष्टीचा गंभीर चेहरामोहराच बदलून टाकला. भावनेला आवाहन करणारे तसेच कल्पकतेने आणि विनोदाने प्रतिपक्षाची भंबेरी उडवून टाकणारे अग्रलेख, ‘संदेशचा अहेर’, ‘बेटा गुलाबच्या कानगोष्टी’, ‘चहा, चिवडा, चिरूट’, ‘संदेश दरबारचा पदवीदान समारंभ’ इ. चटकदार सदरे, चित्तवेधक बातम्या, आकर्षक मथळे यामुळे मराठी वृत्तपत्रीय लेखनात बहुरंगीपणा आला व ते जनसामान्यांपर्यंत पोहचले. त्यांनी चालू केलेल्या मेसेज (१९१७) या इंग्रजी वृत्तपत्राचा मात्र जम बसला नाही.

संदेश लोकप्रियतेच्या शिखरावर असतानाच सरकारी अवकृपेस बळी पडला. पुढे संजय, चाबूक, चाबूकस्वार ह्यांसारखी अनेक पत्रे त्यांनी काढली. पटवर्धन व तुळजापूरकर यांच्या साहाय्याने श्रुतिबोध (१९१२) आणि उषा (१९१३) ही मासिके चालविली. सौ. वत्सलावहिनी यांचे प्रसिद्ध व अप्रसिद्ध लेख (१९१५), चोरी कशी करावी? (१९२५), अच्युतराव कोल्हटकर स्मारक ग्रंथ (भाग १ ते ३, १९३३–३५) इ. पुस्तकांमधून त्यांचे निवडक लिखाण संकलित झालेले आहे.

स्वामी विवेकानंद (आवृत्ती दुसरी, १९१६), नारिंगी निशाण (१९१७) व संगीत मस्तानी (१९२६) यांसारखी नाटकेही त्यांनी लिहिली. स्वत:ची नाटक कंपनी काढून काही नाटकांतून भूमिका केल्या. काही कादंबऱ्या लिहिल्या. तथापि, ‘संदेशकार’ हीच त्यांची जनमानसात विशेष रूढ झालेली प्रतिमा होती.

लोकमान्य टिळकांवरील मृत्युलेख, ‘मराठी काव्याची प्रभात’, ‘शेवटची वेल सुकली’, ‘दोन तात्या’, ‘पुणेरी जोडे’, ‘माधवाश्रमात शिवाजी’ यांसारखे त्यांचे वेचक लेख वृत्तपत्रीय मराठी साहित्याची भूषणे होत. अशा या व्यक्तिमत्वाचे १५ जून १९३१ रोजी निधन झाले. त्यांचे नाव मुंबई–गिरगावातील एका रस्त्याला देण्यात आले आहे.

**–सं.ग. मालशे** (मराठी विश्वकोष)

# ज्येष्ठ नाटककार प्रेमानंद गज्वी

ज्येष्ठ नाटककार आणि लेखक व ’किरवंतकार’ प्रेमानंद गज्वी यांचा आज वाढदिवस. त्यांचा जन्म १५ जून १९४७ रोजी झाला. ते सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून समाजातील विदारक सत्य प्रभावीपणे मांडण्यासाठी प्रसिद्ध आहेत.

प्रेमानंद गज्वी यांचे ’घोटभर पाणी’ अनेक भारतीय भाषांत अनुवादित झालं. ’श्रेष्ठ भारतीय एकांकी’ या द्विखंडीय ग्रंथात प्रसिद्धही झालं. नाना पाटेकरांना घेऊन ते व्यावसायिक रंगमंचावर आलं. महाराष्ट्र मंडळाच्या प्रेमामुळं त्याचा प्रयोग आणि ग्रंथप्रकाशन सोहळा लंडनमध्येही झाला. गोवा विद्यापीठात एमएच्या अभ्यासक्रमात ते शिकवलं जाऊ लागलं. कोकणीत त्याचा अनुवाद झाला.

पं. वसंत देवांनी ’किरवंत’चा हिंदी अनुवाद केला. तो ’समकालीन भारतीय साहित्य’ या साहित्य अकादमीच्या नियतकालिकात प्रसिद्ध झाला नि पुढं दिल्लीच्या श्रीराम सेंटरनं ’महाब्राह्मण’च्या रूपात हिंदी रंगमंचावर तो सादर केला. ’नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा’च्या भारत रंगमहोत्सवातही ते सादर झालं व गाजलं.



प्रेमानंद गज्वी यांचे पहिले नाव आनंद गजभिये.. याबद्दल ते म्हणतात. मुळातच मला कव्वालीचा भारी नाद होता. गावी आमच्या बौद्ध समाजाचं ’भीमबुद्ध भजनी मंडळ’ होतं. ते गावोगावी भजन गात. अशाच एका गावी कव्वालीचा सामना मी केला होता. सिनेमातील गाण्यांच्या चालीवर शे दीडशे गाणी मी लिहिली आहेत.

प्रेमानंद गज्वी यांची गाजलेली नाटके व एकांकिका किरवंत, गांधी आणि आंबेडकर, छावणी, जय जय रघुवीर समर्थ, डॅम इट अनू गोरे, तन–माजोरी, देवनवरी, नूर महंमद साठे, शुद्ध बीजापोटी ही आहेत.

गज्वी यांनी ११ एकांकिका आणि १३ पूर्ण–लांबीची नाटके लिहिली आहेत, त्याशिवाय एक कादंबरी, दोन लघुकथा संग्रह आणि एक कविता संग्रहदेखील लिहिला आहेत. मराठीतील नवीन, सामाजिकदृष्ट्या संबंधित नाटकांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने त्यांनी २००३मध्ये मुंबईत बोधी नाट्य परिषदेची सह–स्थापना केली.

गज्वींची लेखनशैली ही सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून समाजातील विदारक सत्य प्रभावीपणे मांडणारी आहे. त्यांच्या घोटभर पाणी या एकांकिकेचे १४ भाषांत अनुवाद झाले आहेत.

ज्येष्ठ नाटककार आणि लेखक प्रेमानंद गज्वी हे ९९व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष राहिले होते. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नाशिक शाखेच्या वतीने दिला जाणारा वि.वा. शिरवाडकर पुरस्कार आणि मसापचा जीवनगौरव पुरस्कार त्यांना प्राप्त झाला आहे. (साभार : मराठीसृष्टी)

# पेणमध्ये भटक्या कुत्र्यांची दहशत




**पेण : प्रतिनिधी**

गेली अनेक दिवसापासून पेण शहरात भटक्या कुत्र्यांची (श्वानांची) दहशत वाढली असून ते १० ते १५ जणांच्या टोळीने विविध ठिकाणी मुक्त संचार करीत सर्वत्र हैदोस घातला आहे. त्यांच्या दहशतीने लहान मुले, वयोवृद्ध नागरीक तसेच विद्यार्थ्यांसह पालकही भयभीत झाल्याचे चित्र दिसत आहे.

याबाबत पेण नगर परिषदेचे संबंधित खाते मात्र सुस्त अवस्थेत असून जणू काही ते एखाद्यावर जीव घेण्या हल्ल्याचीच वाट बघत आहेत. या कुत्र्यांपासून कुणावर जीवघेणा हल्ला होण्या आगोदर संबधित खात्यांकडून कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी जोर धरत आहे.

पेण शहरात काही दिवसापासून भटक्या कुत्र्यांमध्ये लक्षणीय वाढ झाली असून बहुतेक कुत्र्यांना संसर्गजन्य रोग झाला आहे. हे कुत्रे एस.टी. स्थानक, शिवाजी चौक, कोळी वाडा, मच्छी व मटण मार्केट, खाटिक मोहल्ला देव आली बाजारपेठ कव डाळ तळे कुंभार आळी खान मोहल्ला, चिंचपाडा, बोरगांव रोड, गांधी मंदिर परीसरासह चौका-चौकात व शाळेत जाणाऱ्या रस्त्यांवर १० ते १५ जणांच्या वेगवेगळ्या टोळक्याने (कळपाने) फिरताना दिसतात.

भटक्या कुत्र्यांना संसर्गजन्य रोग झाल्याने त्याच्या वासाने नागरीक बेजार झाले असून रस्त्याने येणारे विद्यार्थी, वाटसरु, चारचाकी वाहने तसेच मोटरसायकलस्वाराच्या अंगावर भुंकत धावून जात आहेत. त्यावेळी घाबरलेल्या वाहन चालकाकडून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच शाळेत जाणारे विद्यार्थी विद्यार्थीनी या टोळक्याच्या मधून भीत भीत वाट काढीत जात असतात. तसे करीत असताना या कुत्र्यांनी हल्ला केला तर तो हल्ला जीवघेणा होऊ शकतो.

हे कुत्रे विशेषत: रात्रीच्या वेळी भुंकून हैराण करीत आहेत. या कुत्र्यांपासून वयोवृद्धांसह नागरीक भयभीत होत आहेत. त्याचप्रमाणे सायंकाळी व पहाटेच्या वेळी बहुतेक नागरीक बोरगांव रोड परिसरात फिरायला येत असतात. ते कुत्र्यांच्या भीतीने जीव मुठीत घेवून फिरत असल्याचे चित्र बहुतांशी दिसत असते. भटक्या कुत्र्यांपासून एखादा मोठा अनर्थ होण्याआगोदरच त्यांचा संबधित खात्याकडून बंदोबस्त करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# श्रीवर्धन तालुक्यात ओव्हरलोड वाहतुकीने रस्त्यांची चाळण

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**



श्रीवर्धन तालुक्यात दिवसेंदिवस वाढणारी ओव्हरलोड वाहतूक स्थानिक प्रशासन आणि शासकीय यंत्रणेसाठी गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहे. कोलमांडला ते बागमांडला मार्ग, तसेच निगडी फाटा ते श्रीवर्धन या मार्गावरील मुख्य रस्त्यांची अवस्था अक्षरशः चाळणीसारखी झाली असून, वाहनचालक आणि नागरिक मोठ्या त्रासाला सामोरे जात आहेत.

या ओव्हरलोड वाहतुकीमुळे रस्त्यांवर उखडलेल्या डांबराच्या थप्प्या, खचलेली साईड पट्टी, आणि मोठमोठे खड्डे नागरिकांच्या दैनंदिन सुरक्षिततेवर घाला घालत आहेत. नुकत्याच झालेल्या पावसामुळे ही स्थिती आणखी बिकट झाली आहे. ११ जून २०२५ रोजी कोलमांडला गावातील नागरिकांनी स्वतः पुढाकार घेत, जवळपास ४० ओव्हरलोड वाहने थांबवून निषेध व्यक्त केला.

अतिरिक्त भारामुळे नुकतेच डांबरीकरण केलेले रस्ते एका वर्षाच्या आत खराब झाले आहेत. यासाठी खर्च झालेला शासनाचा कोट्यवधी रुपयांचा निधी वाया जाण्याची नामुष्की शासनावर ओढवली आहे. नियोजनशून्य वाहतूक व व्यवस्थापनाअभावी सार्वजनिक पैसा अक्षरशः मातीमोल ठरत आहे.

वरिष्ठ अधिकारी, परिवहन विभागाचे उच्चपदस्थ, तसेच जिल्हाधिकारी यांनी त्वरित या प्रकरणात लक्ष घालावे, दोषींवर कारवाई करावी आणि ओव्हरलोड वाहतुकीवर कठोर निर्बंध घालावेत, अशी नागरिकांची ठाम मागणी आहे.

# मागवला फॅन, आल्या विटा! पालीतील शिक्षकाची ऑनलाईन फसवणूक

**पाली : प्रतिनिधी**

ऑनलाईन खरेदीत ग्राहकांची कशी फसवणूक होते याचा प्रत्यय पालीत आला आहे. येथील जनार्दन भिलारे या पदवीधर शिक्षकांनी सोमवारी (दि. ९) फ्लिपकार्टवरून ऑनलाइन शॉपिंगवर सिलिंग फॅन मागवला होता, मात्र या फॅनच्या खोक्यामध्ये चक्क विटा पाठवण्यात आल्या. यामुळे त्यांना प्रचंड मानसिक त्रास झाला. कंपनीसोबत भांडून तक्रार केल्यानंतर त्यांना त्यांचे पैसे रिफंड करण्यात आले.

या फसवणूकी संदर्भातील व्हिडिओ जनार्दन भिलारे यांनी सोशल मीडियावरदेखील पोस्ट केला आहे. जनार्दन भिलारे यांनी फ्लिपकार्टवर ऑनलाईन बजाज सिलिंग फॅन ऑर्डर केला. त्याप्रमाणे सोमवारी डिलिव्हरी प्राप्त झाली. खोका बजाज कंपनीच्या फॅनचा होता, मात्र खोका उघडल्यावर फॅन ऐवजी त्यामध्ये चक्क विटांचे तीन तुकडे निघाले. त्यानंतर त्यांनी ऑनलाईन तक्रार केली. रात्री मोबाईलवर संपर्क केल्यानंतर कंपनीकडून दिलगिरी व्यक्त करण्यात आली. अकाउंट नंबर मागून त्यावर २४३० रुपये घेतलेली रक्कम त्याच रात्री ११.१३ वाजता अकाउंटवर जमा करण्यात आली, पण या सर्व खटापटीत ग्राहक म्हणून जो मानसिक त्रास झाला याला जबाबदार कोण? हा प्रश्न निर्माण होतो.

**यापुढे ऑनलाईन खरेदी करायची की नाही हा माझ्याकडे प्रश्न निर्माण झाला आहे. ग्राहक म्हणून ऑनलाईन खरेदी करताना यापुढे सर्वांनी सावधगिरी बाळगावी. माझी फसवणूक झाली पैसे त्याच दिवशी माझ्या खात्यावर जमा झाले, पण ऑनलाईन तक्रार नोंदवणे, अपडेट घेणे यामध्ये वेळ वाया जातो. मानसिक त्रास होतो. मी कंपनी प्रतिनिधी यांना फोन करून यापुढे कोणत्याही ग्राहकांची फसवणूक होणार नाही याची काळजी घ्यावी या संदर्भात सूचना केलेली आहे.**

**–जनार्दन भिलारे**, शिक्षक, पाली



# ‘बंधूता, न्याय मिळेल असे कार्य प्रत्येकाने करावे’



**चौक : प्रतिनिधी**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या भारतीय संविधानाच्या आधारे प्रत्यक भीमसैनिक यांनी आचरण करून प्रत्येकाला शिक्षित केल्यास भारत एका उंचीवर असेल आणि त्या उंचीचा एक भाग आपण असू, असे उदगार यांनी काढले.


दि बुद्धिस्त सोसायटी ऑफ इंडिया तसेच भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू भीमराव यशवंत आंबेडकर यांचे खालापूर तालुक्याच्या दौऱ्यात वरोसे येथे मोठ्या उत्साहात सन्मानपूर्वक स्वागत करण्यात आले. त्या प्रसंगी ते बोलत होते, ते पुढे म्हणाले शांती, बंधुता, एकता, सुख समाधान नांदावे यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करावे. भीमराव आंबेडकर यांच्या आगमना वेळी गावकऱ्यांनी फटाक्यांच्या आतिशबाजी करून आनंदोत्सवात साजरा केला. ग्रुप ग्रामपंचायत लोधीवली सदस्य आणि युवा नेते चेतन मेश्राम यांच्या हस्ते भीमराव यशवंत आंबेडकर यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या वेळी नामफळकाचे अनावरण त्यांच्या हस्ते करण्यात आले. वरोसे ग्राम शाखेचे अध्यक्ष दीपक निकाळजे, उपाध्यक्ष निलेश निकाळजे, सल्लागार स्वप्नील मेश्राम, संरक्षण प्रमुख प्रशांती निकाळजे तसेच ज्येष्ठ कार्यकर्ते अश्विल मेश्राम, संदेश वाघमारे, महेंद्र निकाळजे, राहुल निकाळजे, संतोष निकाळजे, तुषार बनसोडे हेही उपस्थिती होते. वरोसे गावच्या माता रमाबाई महिला मंडळातील महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

या वेळी भीमराव यशवंत आंबेडकर साहेबांनी उपस्थितांना शांती, बंधुता आणि समाजात सुख-समाधान नांदावे असा संदेश दिला.

# दिनकर भुजबळांची नियुक्ती

**खालापूर, मोहोपाडा : प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईतर्फे एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. संघटनेचे प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांच्या शिफारशीनुसार, कोकण विभागीय अध्यक्ष शैलेश पालकर व रायगड जिल्हाध्यक्ष राकेश खराडे यांच्या मान्यतेने ज्येष्ठ पत्रकार दिनकर शंकर भुजबळ यांची रायगड जिल्हा सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

ही नियुक्ती १ जून २०२५ रोजी अधिकृतपणे जाहीर झाली असून, राज्यस्तरीय अधिवेशनात घेतलेल्या निर्णयाला अनुसरून दिनकर भुजबळ हे आता संघटनेच्या २०२५-२६ या कार्यकाळात रायगड जिल्हा सदस्य म्हणून सक्रीय भूमिका पार पाडणार आहेत.

या नियुक्तीनुसार भुजबळ यांच्याकडे जिल्ह्यातील पत्रकार सदस्य संख्या वाढवणे, वार्षिक व प्रवेश शुल्क संकलन, स्थानिक पत्रकार हिताचे उपक्रम, तसेच तालुकास्तरावरील नव्या शाखांची उभारणी यासारख्या संघटनात्मक जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. तसेच जिल्ह्यातील पत्रकारांच्या समस्या सोडवण्यासाठी ते जिल्हाध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत राहणार आहेत.


## महानिर्मिती ई-निविदा प्रकाशनाची सूचना

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित

महानिर्मिती, औ.वि. केंद्र परळी- वै. कडून अनुभवी व नामांकित उत्पादक/ पुरवठादार / कंत्राटदारा कडून खालील काम / वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेतण

| ई-निविदा क्रमांक | विषय | अंदाजित रक्कम/ बयाना रक्कम | ई-निविदा विक्रीचा कालावधी | ई-निविदा स्वीकृत (१२.०० पर्यंत) |
|---|---|---|---|---|
| ई-निविदा क्र ३००००५८५२१ | बाइएनिअल वर्क कॉंट्रॅक्ट फॉर प्रोवायडिंग स्कूल बस सर्विस फॉर वॉर्ड ऑफ एम्प्लॉईज वर्किंग अॅट परळी टीपीएस अॅट सीएचपी, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ९१.१९लाख ९४६९१/- | १६.०६.२०२५ ते २६.०६.२०२५ | २७.०६.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००५७६५८ | प्रॉक्यूरमेंट ऑफ कंट्रोल कॅबिनेट पॅनल फॉर मोटोराइज्ड ऑपरेटेड एक्चूऐटर्स ड्यूरिंग एओएच फॉर ईटी यू-८, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ७.२० लाख १०७००/- | १६.०६.२०२५ ते ०१.०७.२०२५ | ०२.०७.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००५८०७८ | रीपेरिंग, क्लिनिंग अँड पेंटिंग ऑफ व्हेरियस टॉक्स ड्यूरिंग सीओएच अॅट टीएम- ।।, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ३.९३ लाख ७४३६/- | १६.०६.२०२५ ते ०१.०७.२०२५ | ०२.०७.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००५८०९९ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ कास्ट बसाल्ट लाइनड बेण्ड्स (२०० एनबी ) रीक्वायर्ड फॉर अॅश स्लरी डिसपोजल लाइन फॉर अॅश हॅंडलिंग प्लांट परळी, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ९.६६ लाख १३१६७/- | १६.०६.२०२५ ते ०१.०७.२०२५ | ०२.०७.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००५८११४ | वर्क ऑफ फिल्ट्रेशन ऑफ व्हेरियस ऑइल्स ड्यूरिंग सीओएच अॅट टीएम ।।, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | १५.२२ लाख १८७२३/- | १६.०६.२०२५ ते ०१.०७.२०२५ | ०२.०७.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००५८३२३ | वर्क ऑफ रिनोवैशन / रिपेर अँड पार्शल रिप्लेस्मेंट ऑफ इकॉनॉमिझर कॉइल्स ड्यूरिंग अॅन्युअल ओवरहौल ऑफ यूनिट-८ अॅट बीएम २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ४९.४९ लाख ५२९९४/- | १६.०६.२०२५ ते ०१.०७.२०२५ | ०२.०७.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००५८३२७ | प्रॉक्यूरमेंट ऑफ व्हेरियस टाइप्स ऑफ ग्राफिट सील रिंग, ग्लॅंड अँड स्पीरल वून्ड गॅसकेट ड्यूरिंग सीओएच अॅट टीएम ।।, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ४.६८ लाख ८१८७/- | १६.०६.२०२५ ते ०१.०७.२०२५ | ०२.०७.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००५८३९४ | वर्क ऑफ रिमूवल अँड ॲप्लिकेशन ऑफ इन्स्युलेशन टु व्हेरियस ऑक्झिलयरीज अँड पाइप लाइन्स इन टर्बाइन हाऊस ड्यूरिंग सीओएच अॅट टीएम ।। ,२५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ६.४६ लाख ९९६३/- | १६.०६.२०२५ ते ०१.०७.२०२५ | ०२.०७.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००५८४०१ | प्रॉक्यूरमेंट ऑफ मेजरिंग इन्स्ट्रुमेंट फॉर डे टु डे मेंटेनेंस अॅक्टीव्हिटीज अँड ड्यूरिंग एओएच अॅट ईटी यू ८,२५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | २.९८ लाख ६४८३/- | १६.०६.२०२५ ते ०१.०७.२०२५ | ०२.०७.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००५८४६५ | वर्क कॉंट्रॅक्ट फॉर क्लिनिंग ऑफ वॉटर कूलर फॉर एचटी मोटर्स ड्यूरिंग सीओएच अॅट ईएम ।। , २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ०.९० लाख २७१२/- | १६.०६.२०२५ ते ०१.०७.२०२५ | ०२.०७.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००५८४७० | प्रॉक्यूरमेंट ऑफ व्हेरियस साइज अँड टाइप्स ऑफ बेण्ड्स फॉर ड्राय फ्लाय अँड वेट कोर्स अॅश इव्हॅक्यूऐशन अँड कन्वेईंग सिस्टम इन सीओएच अॅट एएचपी यू ८, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै | ४.९६ लाख ८४६९/- | १६.०६.२०२५ ते ०१.०७.२०२५ | ०२.०७.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००५८४७९ | वॉटर अँड ऑइल कूलेर्स सर्व्हिसिंग ऑफ आयडी, एफडी, पीए एयर हीटर्स अँड कोल मिल ड्यूरिंग अॅन्युअल ओवरहौल ऑफ यूनिट ८ अॅट बीएम २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै | १.७३ लाख ५१९१/- | १६.०६.२०२५ ते ०१.०७.२०२५ | ०२.०७.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००५७७९१ | वर्क ऑफ डिस्मैन्टलिंग रिफॅब्रीकेटिंग ऑफ एचटी/एलटी पॅनल अॅट सीएचपी ।, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ५.८१ लाख ९३१०/- | १६.०६.२०२५ ते ०७.०७.२०२५ | ०८.०७.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००५७९४१ | प्रॉक्यूरमेंट ऑफ व्हेरियस स्पेअर् फॉर एचएजी,सीएजी अँड कोल फीडर आऊट लेट गेट ड्यूरिंग अॅट एओएच यू ७ अॅट आय अँड सी -१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै | ७.२०लाख १०७०१/- | १३.०६.२०२५ ते ०७.०७.२०२५ | ०८.०७.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००५७९५३ | प्रॉक्यूरमेंट ऑफ स्पेअर् फॉर एचपीबीपी सिस्टीम अँड इट्स ओएसयू ड्यूरिंग एओएच यू ७ अॅट आय अँड सी -१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै | ७.९९ लाख ११४९९/- | १६.०६.२०२५ ते ०७.०७.२०२५ | ०८.०७.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००५८०३३ | वर्क ऑफ रिकंन्डिशनिंग,रीपेरिंग अँड रिफब्रिश्मेन्ट ऑफ लो-स्पीड कौप्लिंग हब फॉर कोल मिल बीबीडी-४७७२ अॅट बीएम- ।, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै | १४.०४लाख १७५४०/- | १६.०६.२०२५ ते ०७.०७.२०२५ | ०८.०७.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००५८०३९ | वर्क ऑफ मशीनिंग अँड डायनॅमिक बॅलेन्सिंग ऑफ हाय-स्पीड ग्रिड फ्लेक्स कपलिंग हब फॉर कोल मिल बीबीडी-४७७२ अॅट बीएम-१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै | २.७६ लाख ६२६५/- | १६.०६.२०२५ ते ०७.०७.२०२५ | ०८.०७.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००५८०७६ | अॅन्युअल मेंटेनेंस कॉंट्रॅक्ट फॉर लायटिंग मेंटेनेंस अॅट ईएम-१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै | ६.७६ लाख १०२६७/- | १६.०६.२०२५ ते ०१.०७.२०२५ | ०२.०७.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००५८२७५ | प्रॉक्यूरमेंट ऑफ लवजॉय गियर फ्लेक्स कप्लिंग कवर फॉर कोल मिल बीबीडी ४७७२ अॅट बीएम-१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै | १८.२०लाख २१७०९/- | १६.०६.२०२५ ते ०७.०७.२०२५ | ०८.०७.२०२५ |
| ई-निविदा क्र ३०००५८२७७ | प्रॉक्यूरमेंट ऑफ स्पअर्स फॉर हाय-स्पीड कप्लिंग (एलजीएफ-६८५) फॉर कोल मिल बीबीडी ४७७२ अॅट बीएम १, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै | १९.२९लाख २२७९७/- | १६.०६.२०२५ ते ०७.०७.२०२५ | ०८.०७.२०२५ |
| ई-निविदा क्र ३००००५८३५९ | टु इयर वर्क कॉंट्रॅक्ट फॉर प्रोवायडिंग सर्विसेस ऑफ टाटा इडिका /विस्टा/ मारुति स्वीफ्ट / इक्विवलन्ट ए/सी कार ऑन डेलि हाइअर बेसिस फॉर एसई (एम) अॅट सीएचपी २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | २१.४८ लाख २४९८७/- | १६.०६.२०२५ ते ०७.०७.२०२५ | ०८.०७.२०२५ |

वरील तारीखेस ई-निविदा विक्री सुरू होण्याची वेळ : ११:०० व ई-निविदा विक्री बंद होण्याची वेळ १६:००, निविदा किंमत व बयाना रक्कम ऑनलाइन पद्धतीने भरावयाची आहे. सर्व निविदा करिता निविदा किंमत रु.११८०/- (जीएसटी सह) संपर्क व्यक्ती : मुख्य अभियंता, टीपीएस परळी -वैजनाथ, मेल आय डि-parlitpsrp@mahagenco.in, cegenparli@mahagenco.in अधिक माहितीसाठी आणि विक्रेता नोंदणीसाठी आमच्या वेबसाईटला भेट : https://eprocurement.mahagenco.in SRM help desk Email ID - etendering.prl@mahangeco.in एस.आर.एम. मदत लाईन क्रमांक - ८४११९७१५२५

**मुख्य अभियंता**



## पनवेल महानगरपालिका
### ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६

### जाहीर आवाहन

पनवेल महानगरपालिकेमार्फत आकारण्यात आलेल्या पूर्वलक्षी मालमत्ता कराबाबत मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या स्पेशल लीव्ह पिटीशन क्रमांक १०८४९/२०२३ मधील सिव्हिल अपील क्रमांक ६०६५/२०२४ संदर्भातील अंतरिम निकाल दिनांक २९ एप्रिल २०२४ रोजी लागला आहे. सदर अंतरिम निकालानुसार खालील निर्देश देण्यात आले आहेत. त्याचा सारांश पुढीलप्रमाणे आहे :-

१. करनिर्धारण वर्ष २०२१-२२ पासून मालमत्ता कराच्या सर्व थकीत रकमेचा भरणा सदरील अंतरिम आदेश दिनांकाच्या दोन महिन्यांच्या आत अपिलार्थी यांनी करावे.
२. भविष्यात अपिलार्थी यांचे अपील अयशस्वी ठरल्यास त्यांना २०१६ पासून मा. सर्वोच्च न्यायालय निर्देश देईल. अशा दराने व्याज आकारून सर्व थकीत रकमेचा भरणा करावा लागणार.
३. या निर्देशांचे, पालन करण्यास अपीलार्थी अयशस्वी ठरल्यास या निर्देशान्वये देण्यात आलेला दिलासा आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेश दिनांकाच्या दोन महिन्याच्या कालावधीत अपीलार्थी यांच्या अनेक सदस्यांनी उक्त निर्देश क्रमांक १ नुसार मालमत्ता कराचा भरणा न केल्याने या निर्देशान्वये देण्यात आलेला दिलासा आपोआप रद्दबातल ठरला आहे.

या न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने महानगरपालिकेने जेष्ठ विधीज्ञ यांचे मार्गदर्शन घेतले असून त्यानुसार सदर न्यायालयीन प्रकरण हे केवळ अपीलार्थी यांच्यापुरते मर्यादित असल्याने व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त निर्देशायान्वये अंतरिम आदेशाच्या दोन महिन्याच्या कालावधीत निर्देशांचे पालन करण्यास अपीलार्थी यांच्या सदस्यांपैकी जे अयशस्वी ठरले आहेत त्यांना देण्यात आलेला दिलासा आपोआप रद्दबातल ठरला असल्याने आता सन २०२५-२६ चे मालमत्ता करायचे देयक हे ''**भाग अ (सन २०१६-१७ ते सन २०२०-२१), भाग ब (सन २०२१-२२ ते सन २०२४-२५) व भाग क (चालू वर्ष)**'' अशा नमुन्यात तयार न करता **मागील – चालू –एकूण** या प्रकारात तयार करण्यात आले असून त्याचे वितरण सुरू करण्यात आलेले आहे. तसेच मागील देयकामध्ये भाग अ च्या रकान्यात शास्तीची रक्कम दर्शविण्यात आलेली नव्हती. मात्र सन २०२५-२६ च्या सुधारित कर देयकात शास्ती रकान्यात भाग अ मधील शास्ती चा समावेश करण्यात आलेला आहे. याची सर्व करदात्यांनी नोंद घ्यावी व मालमत्ता कराचा भरणा करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे.

तथापि, अपीलार्थी यांच्या सदस्यांपैकी ज्या सदस्यांनी उक्त अंतरिम आदेशानुसार २९ एप्रिल २०२४ पासून दोन महिन्याच्या आत सन २०२१-२२ पासून पुढील मालमत्ता कराच्या थकबाकीचा भरणा केला आहे. त्यांना उक्त अंतरिम आदेशान्वये देण्यात आलेला लाभ सुरु ठेवण्यात येत आहे. म्हणजेच सदर सदस्यांना सन २०२५-२६ या नवीन आर्थिक वर्षाकरिता मालमत्ता कराचे देयक ''**भाग अ (सन २०१६-१७ ते सन २०२०-२१), भाग ब (सन २०२१-२२ ते सन २०२४-२५) व भाग क (चालू वर्ष)**'' या नमुन्यात www.panvelmc.org या संकेतस्थळावर तसेच PMC Tax या ॲप वर उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर सदस्यांना **भाग अ (सन २०१६-२१)** चा भरणा करणे ऐच्छिक असेल. मात्र **भाग क (चालू वर्ष)** चा भरणा करण्याकरिता **भाग ब (सन २०२१-२२ ते सन २०२४-२५)** चा भरणा करणे बंधनकारक असेल. सदर सदस्यांना सुधारित मागणी देयक वितरित करण्याचे काम प्रगतिपथावर आहे.

पनवेल महानगरपालिकेतील सर्व करदात्यांना मालमत्ता कराची मागणी देयके वितरित करण्याचे काम सुरू असून ज्यांना अद्यापही देयके प्राप्त झालेली नाहीत त्यांनी www.panvelmc.org या संकेतस्थळावरून तसेच PMC Tax या ॲप वरून देयक उपलब्ध करून घ्यावे. दिनांक ३१ जुलै २०२५ अखेर मालमत्ता कर भरणा केल्यास चालू वर्षातील मागणीवर ५ टक्के सूट व ऑनलाइन भरणा केल्यास संपूर्ण रकमेवर २ टक्के अतिरिक्त सूट देण्यात येत आहे. यांचा सर्व करदात्यांनी लाभ घेऊन मालमत्ता कराचा भरणा करण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे. विहीत मुदतीत मालमत्ता कराचा भरणा न केल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कराधान नियम ४१ अन्वये प्रतिमहा २% शास्ती लागत असल्याने विहीत वेळेत मालमत्ता कराचा भरणा करावा असे आवाहन करण्यात येत आहे.

**सही/-**
**उपायुक्त (कर)**
**पनवेल महानगरपालिका**

# पदपथांवर बांधकाम साहित्य

## पादचाऱ्यांवर रस्त्यावरून चालण्याची वेळ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शहरात नव्याने होणाऱ्या इमारती तसेच पुनर्विकासातील इमारतींची कामे मोठ्या प्रमाणात सुरू आहे, मात्र बांधकाम व्यावसायिकांच्या मनमानीमुळे बांधकामाचे साहित्य पदपथावरच पडून असते. त्यामुळे पादचाऱ्यांना पदपथ सोडून मुख्य रस्त्यावरून चालावे लागते. सीवूड्स सेक्टर २५ येथे महाविद्यालयासमोरील पदपथ बांधकाम साहित्याने अडविल्याने विद्यार्थी रस्त्यावरून मार्गक्रमण करतात. येथेच एका बाजुला पदपथ तर दुसऱ्या बाजुला सीवूड्स पूर्व पश्चिम जोडणारा उड्डाणपूल आहे. त्यामुळे पादचाऱ्यांचे रस्त्यावरून मार्गक्रमण धोकादायक ठरू शकते.



पालिकेने व संबंधित बांधकाम व्यावसायिकांनी नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक असते, मात्र बांधकामविषयक अनेक नियमच धाब्यावर बसविण्याचे प्रकार शहरात सुरू आहेत. वाशी, सीवूड्स विभागात बांधकामासाठी ब्लास्टिंगचा मनमानी वापर होत असतो. याबाबत पालिकेने बांधकाम नियमावलीही जाहीर केली आहे, पण या नियमावलीचा विविध ठिकाणी भंग होत असतो. सीवूड्स परिसरात बांधकाम व्यावसायिकाने पदपथच गिळंकृत केला आहे.

सीवूड्स रेल्वेस्थानक पूर्व भागात अनेक शैक्षणिक संकुले व शाळा, महाविद्यालये आहेत. नागरिक, विद्यार्थी चालताना पदपथाचाच वापर करतात, मात्र इमारतीसाठी लागणाऱ्या लोखंडी सळ्या, पेव्हर ब्लॉक तसेच लोखंडी जाळ्या निर्मितीचे साहित्य या पदपथावर पसरलेले असते. एका बाजुला पदपथ तर दुसऱ्या बाजुला सीवूड्स पूर्व पश्चिम जोडणारा उड्डाणपुल आहे. महाविद्यालयीन व शाळकरी विद्यार्थ्यांना रस्त्यावरुनच धोकादायक पद्धतीने चालावे लागते.

वाशी सेक्टर २ परिसरात मेघदूत सिनेमा, अबॉर्ट हॉटेल परिसरात सुरू आहेत. वाशीसारख्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या अनेक बांधकाम व्यावसायिकांचे बांधकामाचे साहित्य, तसेच यंत्र पदपथावरच ठेवले असताना त्यावर कारवाई झाली होती. अशीच कारवाई सीवूड्स सेक्टर २५ येथे करण्याची मागणी होत आहे.

**व्यावसायिकांना बांधकामाबाबत नियमावली निश्चित केली आहे. बांधकामाचे साहित्य पदपथावरच ठेवले असेल तर संबंधित अधिकाऱ्यामार्फत पाहणी करून कारवाई करण्यात येईल.**
**–सोमनाथ केकाण, सहाय्यक संचालक, नगररचना**

*सीवूड्स स्थानकाबाहेर पूर्वेला आमचे महाविद्यालय आहे. महाविद्यालयाच्या शेजारीच नव्या इमारतींची बांधकामे सुरू आहेत. यामुळे रस्त्यावरूनच जावे लागते. त्यामुळे अपघाताची भीती आहेच. हे पदपथ चालण्यासाठी मोकळे असणे आवश्यक आहे.*
**–दिनेश वर्मा**, विद्यार्थी

# जेएनपीएची वातानुकूलित ई-बोटसेवा

## लवकरच प्रवाशांच्या सेवेत होणार दाखल

**उरण : रामप्रहर वृत्त**

जेएनपीए बंदर ते मुंबईदरम्यानची वातानुकूलित ई-बोटसेवा येत्या सोमवारपासून सुरू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जेएनपीए ते मुंबई हे अंतर अवघ्या २५ मिनिटांत पार करता येईल. जेएनपीए ते गेटवे ऑफ इंडियादरम्यान सुरू आहे. पावसाळ्यात सध्या ही सेवा जेएनपीए ते भाऊचा धक्कादरम्यान आहे. या प्रवासाला एक तास लागत होता, मात्र नव्याने सुरू करण्यात येणाऱ्या या सेवेमुळे तासभराचा हा प्रवास अवघ्या २५ मिनिटांत करता येणार आहे.

जेएनपीए बंदर ते मुंबईदरम्यानची वातानुकूलित ईबोट सेवेमुळे उरणकरांना गारेगार प्रवास करता येणार आहे. या जलद प्रवासासाठी जादाचे दर आकारले जाणार आहेत. जेएनपीए बंदर ते गेटवे ऑफ इंडिया या मार्गावरील लाकडी बोटींच्या प्रवासाला ब्रेक लावण्याचा निर्णय जेएनपीए संचालक मंडळाने घेतला आहे. येत्या नवीन वर्षापासून बंदरातून मुंबईत प्रवाशांना घेऊन जाण्या-येण्यासाठी अद्ययावत स्पीडबोटी धावणार आहेत. या प्रदूषणविरहित स्पीडबोटीचा फायदा या सागरी मार्गावरून प्रवास करणाऱ्या सर्वांनाच होणार आहे. या सागरी मार्गाने जेएनपीएचे कामगार, नातेवाईक, स्थानिक प्रकल्पग्रस्त, कस्टम, एअरफोर्स, सीआयएसएफ, पोर्ट युजर्स आदी कामगारांसाठी वापर करता येत आहे. सकाळी सात वाजल्यापासून रात्री दहा वाजेपर्यंत या मार्गावरून बोटी सुरू असतात.



**प्रदूषणविरहित इलेक्ट्रॉनिक बॅटऱ्यांवर चालणाऱ्या सोयीसुविधांनी सुसज्ज स्पीड बोटींचा पर्याय स्वीकारण्याची संकल्पना वर्षाभरापूर्वीच जेएनपीएचे अध्यक्ष उन्मेष वाघ यांनी अमलात आणण्यासाठी सूचना केली होती. त्याची अंमलबजावणी सुरू करण्यासाठी जेएनपीए प्रशासनाने जय्यत तयारी सुरू केली असून सोमवारपासून ही सेवा सुरू होणार आहे.**
**–बाळासाहेब पवार, उपसंरक्षक कॅप्टन, जेएनपीए**

ई-बोटी सुरू करण्यासाठी माझगाव डॉक व जेएनपीएकडून पाच महिन्यांपासून तारखा जाहीर करण्यात येत होत्या. मात्र, स्पीड बोट सेवा सुरू करणे जेएनपीए-माझगाव डॉकला शक्य झाले नाही. आता माझगाव डॉक बिल्डर्स लिमिटेड जेएनपीएदरम्यान सलग दहा वर्षांऐवजी प्रत्येक वर्षासाठी करार करण्यावर एकमत झाले आहे. माझगाव डॉक बिल्डर्स लिमिटेड कंपनीकडून जेएनपीए-मुंबई या सागरी मार्गावर प्रवाशांसाठी स्पीड बोट सेवा सुरू होणार आहे. याआधी लाकडी बोटींसाठी १५० रुपये इतकी परतीच्या तिकीट दराची आकारणी केली जात होती, मात्र ई-स्पीडबोटींसाठी अधिक तिकीट दर आकारण्यात येणार आहे.

# नवी मुंबई मनपाच्या सर्व ८० शाळांमध्ये उद्यापासून प्रवेशोत्सव



**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्याकडून प्राप्त झालेल्या १२ मार्च २०२५ रोजीच्या पत्रानुसार १०० शाळांना भेटी हा निर्णय शासनाने घेतलेला आहे. या अनुषंगाने मंत्री, खासदार, आमदार, लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी हे यावर्षीच्या शालेय वर्ष आरंभाच्या पहिल्या दिवशी म्हणजेच १६ जून २०२५ रोजी एकेक शाळेमध्ये भेट देऊन नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आहेत.

याकरिता नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार सर्व शाळांमध्ये कार्यक्रमाचे नियोजन केलेले आहे. कोणत्या शाळांना कोणते अधिकारी भेट देतील याचे पूर्व नियोजन करण्यात आलेले असून शालेय स्तरावर मुख्याध्यापकांनाही याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

नवागत विद्यार्थ्यांच्या स्वागताकरिता गुलाबाची फुले, चॉकलेट व्यवस्था तसेच रांगोळी सजावट, वर्ग सजावट करणे, शैक्षणिक साहित्यांचे प्रदर्शन भरविणे, सेल्फी पॉईंट करणे, लेझीमच्या तालावर ढोलताशांच्या गजरामध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत करणे अशा विविध प्रकारे हा शालेय आरंभ दिन उत्साहात साजरा केला जाणार आहे.

या अनुषंगाने महानगरपालिकेच्या प्रत्येक शाळेमध्ये स्वच्छता झालेली असून वर्गसजावटीचेही काम सुरू आहे. सुट्टीच्या कालावधीत शाळेला आवश्यक रंगरंगोटीही करण्यात आलेली आहे. सर्व मुख्याध्यापकांनी आपल्या शाळा व्यवस्थापन समितीची बैठक घेऊन सर्वांना शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी उपस्थित राहण्याबाबत माहिती दिलेली आहे. मान्यवर व्यक्तींना आमंत्रित करण्यात आलेले आहे.

यादिवशी नवीन विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचा संच दिला जाणार असून त्याकरिता पाठ्यपुस्तके शाळांपर्यंत पोहचलेली आहेत. शाळांनी पाठ्यपुस्तकांवर शाळेचे शिक्के मारून ती वाटप करण्यासाठी तयार ठेवलेली आहेत. विद्यार्थ्यांचे औक्षणही केले जाणार आहे. विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लागावी, त्यांना कोणत्याही प्रकारचे दडपण वाटू नये व दडपण विरहित आनंददायी वातावरणामध्ये शाळेमध्ये त्यांनी पहिले पाऊल ठेवावे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असून त्यादृष्टीने नवी मुंबई महानगरपालिकेच्या ८० शाळांमध्ये या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षण विभागाच्या उपआयुक्त संघरत्ना खिल्लारे यांच्या नियंत्रणाखाली नियोजन करण्यात आलेले आहे. मान्यवरांनी शाळेला भेटी दिल्यानंतर शाळा भेटीचा फॉर्म भरून ठेवण्याबाबतची तयारीही पूर्ण झालेली आहे. अशाप्रकारे १६ जून रोजी नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी शिक्षण विभागाची सर्व यंत्रणा सुसज्ज आहे.

# ऑटिझमग्रस्त झिम्बाब्वेच्या सात वर्षीय मुलावर भारतात उपचार



**नवी मुंबई : बातमीदार**

रिजनरेटिव्ह मेडिसिन एक्स्पर्ट आणि स्टेमआरएक्स हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरचे संस्थापक डॉ. प्रदीप महाजन यांच्या नेतृत्वाखालील टिमने झिम्बाब्वे येथील ऑटिझमग्रस्त सात वर्षांच्या शॉन अपुवानाशेवर सेल बेस थेरेपीने यशस्वी उपचार करत त्याला नवे आयुष्य मिळवून दिले.

शॉन अपुवानाशेला आयुष्याच्या सुरुवातीलाच विकासात्मक आव्हानांचा सामना करावा लागला. ऑटिझम असलेल्या इतर मुलांप्रमाणेच त्यालादेखील स्वतःला व्यक्त करण्यात, सामाजिक संबंध निर्माण करण्यात आणि दैनंदिन क्रियांमध्ये अडचण येत होती. त्याचे पालक खूप चिंतातूर झाले होते, परंतु मुल बरे होण्याची जिद्द न सोडता त्यांनी भारतातील स्टेमआरएक्स हॉस्पिटलविषयी माहिती गोळा केली आणि तिथे नाविन्यपूर्ण उपचार पर्याय अवलंबविण्याचा निर्णय घेतला.

स्टेमआरएक्स हॉस्पिटलचे संस्थापक आणि रिजनरेटिव्ह मेडिसिन एक्स्पर्ट डॉ. प्रदीप महाजन सांगतात की, शॉनवर उपचार सुरू झाले तेव्हा त्याच्या विशिष्ट गरजांनुसार रिजनरेटिव्ह उपचारांची मदत घेण्याचा निश्चय केला. यामध्ये स्टेम सेल थेरपी, न्यूरो-रिहॅबिलिटेशन, ऑक्युपेशनल थेरपी, सेन्सरी इंटिग्रेशन, बिहेवियरल थेरपी आणि पोषणविषयक मार्गदर्शन यासारख्या उपचारांचा समावेश होता, ज्याचा उद्देश ऑटिझम असलेल्या मुलांना त्यांची सर्वोत्तम क्षमता साध्य करण्यास मदत करणे हा होता. उपचार सुरू केल्यानंतर लगेचच शॉनने त्यास उत्तम प्रतिसाद दिला. जरी बदल लहान असले तरी ते त्याच्या आणि त्याच्या कुटुंबासाठी खूप अर्थपूर्ण होते. तो अधिक चांगला प्रतिसाद देऊ लागला, लक्ष केंद्रित करु लागला आणि संवाद साधण्याचे नवीन मार्ग शोधण्यास सुरुवात करत होता, ज्यामुळे त्याच्या कुटुंबियांना आनंद आणि आशेचा नवा किरण मिळाला.

# ओएलएक्सवर सोफा विकणे पडले महागात; क्षणात ११ लाखांचा फटका

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वापरलेली वस्तू सेकंड हॅन्ड विकत घेणे देणे यासाठी ओ एल एक्स वेबसाईटचा वापर केला जातो, मात्र या माध्यमातून ओळख करून सोफासेट विकत घेण्याच्या बहाण्याने ११ लाख १३ हजार रुपयांची ऑनलाईन फसवणूक झाल्याचा प्रकार घडला आहे. या प्रकरणी रबाळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात संबंधित व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मरोळ येथे राहणारे ग्रॅव्हीन मेस्क्रेव्ह यांना घरातील सोफासेट विकण्याचा होता. यासाठी त्याची जाहिरात त्यांनी ओ एल एक्स यावर टाकली होती. ६ जून रोजी राजेश मिश्रा नावाच्या व्यक्तीने त्यांना संपर्क करून सोफासेट आवडला असून विकत घेण्याचे असल्याचे सांगितले. सोफासेटची ठरलेली किंमत ऑनलाईन देण्याचा प्रयत्न केला, मात्र तांत्रिक कारणांनी पैसे जात नाहीत असा बहाणा करून मिश्रा याने स्वतःचा क्यूआर कोड फिर्यादी यांना पाठवला.

क्यूआर कोड स्कॅन करून १ रुपया पाठवा तो रुपया आला की त्या खात्यावर सोफासेटचे पैसे पाठवतो असे सांगितल्याने फिर्यादी यांनी तसे केले, मात्र काही वेळातच फिर्यादी यांच्या खात्यातील ११ लाख १३ हजार ८४ रुपये मिश्रा याच्या खात्यात वळते झाले. हे लक्षात आल्यावर मिश्रा याला फिर्यादी यांनी संपर्क करण्याचा प्रयत्न केला, मात्र फोन बंद आला ही घटना ६ जून ते ७ जूनदरम्यान घडली आहे. या प्रकरणी १२ तारखेला रबाळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात संबंधित व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.



**उलवे : अहमदाबादमध्ये विमान दुर्घटनेत मृत्यू झालेल्या व्यक्तींना हनुमान मंदिर सेक्टर १७ येथील योग ग्रुपकडून श्रद्धांजली वाहण्यात आली.**

# मैथिली पाटीलच्या कुटुंबियांचे प्रीतम म्हात्रे यांनी केले सांत्वन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

न्हावे गावातील मैथिली पाटील यांच्या दुःखद निधनानंतर भाजपचे नेते प्रीतम म्हात्रे यांनी त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. संकटाच्या या कठीण काळात प्रीतम म्हात्रे यांनी त्यांच्या दुःखात सहभागी होत मानसिक आधार दिला. या वेळी प्रीतम म्हात्रे यांनी संपूर्ण कुटुंबियांच्या सोबत खंबीरपणे उभं राहण्याचा विश्वास व्यक्त केला.



अहमदाबादमधील विमान अपघातात पनवेल तालुक्यातील न्हावा गावातील मैथिली मोरेश्वर पाटीलचा हिचा दुर्दैवी मृत्यू झाला. न्हावा गावातील हवाई सुंदरी मैथिली मोरेश्वर पाटील हिच्या दुःखद निधनाने न्हावा गावावर शोककळा पसरली आहे. प्रीतम म्हात्रे यांनी मैथिलीच्या कुटुंबीयांची न्हावा येथे जाऊन भेट घेतली. न्हावा गावावर पसरलेली शोककळा पाहून प्रीतम म्हात्रे यांनाही तीव्र दुःख झाले. विमान अपघाताची घडलेली ही घटना अतिशय वेदनादायक असून न्हावा गावच्या कन्येचे या दुर्दैवी अपघात निधन झाल्याचे समजताच गावात स्मशानशांतता पसरली आहे. या वेळी न्हावा गावचे माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे उपस्थित होते.

## क्लिक...क्लिक...!



**मुरुड : पावसाळ्यामुळे समुद्रातील मासेमारी बंद झाल्याने मोठ्या बोटी किनाऱ्यावर आणण्यात आल्या आहेत. पाऊस येणार म्हणून बोटींवर प्लास्टिक लावण्यात आले आहे.** (छाया : सुधीर नाझरे)

# एक जण बेपत्ता



**पनवेल :** नेरे, महालक्ष्मी नगर येथील उमेश लक्ष्मण कटके (वय ४२) हा घरातून कोणाला काही न सांगता निघून गेल्याने तो हरवला असल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली. तो अंगाने मध्यम असून त्याचा चेहरा गोरा आणि उभट आहे. त्याच्या डाव्या डोळ्याच्या बाजूस दोन तीळ असून अंगात ग्रे कलरचा टी शर्ट आणि काळा बर्मुडा परिधान केला आहे. त्याला मराठी, हिंदी, इंग्रजी भाषा येते. या व्यक्तीबद्दल अधिक माहिती असल्यास पोलीस नाईक प्रदीप पोपेटे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



# सुधागडात बँकेमध्ये चोरी; एटीएम, साहित्याची तोडफोड

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यातील नांदगाव येथील आयडीबीआय बँकेत चोरांनी घुसून चोरी केली. या वेळी त्यांनी बँकेच्या बाजूला असलेल्या एटीएमची व सीसीटीव्ही कॅमेऱ्याची तोडफोड केली. याबाबत पाली पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून एक चोर सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की फिर्यादी आयडीबीआय बँकेचे मॅनेजर ए.व्ही. सारथचंद्रन रामचंद्रन यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार गुरुवारी रात्री अज्ञात व्यक्तीने बँकेच्या स्लायडिंग खिडकीचे लोखंडी ग्रील उचकटून बँकेत प्रवेश केला आणि चोरी केली तसेच बँकेलगत असलेल्या एटीएमची तोडफोड करण्यात आली. एटीएम रूममधील सीसीटीव्ही कॅमेरे फोडण्यात आले आणि सहा हजार रुपयांचा एलजी कंपनीचा मॉनिटरदेखील चोरून नेला. या चोराने एटीएम विटा मारून आणि दांडक्याने फोडण्याचा प्रयत्न केला.

पाली पोलीस ठाण्याचे तपास अधिकारी सहायक निरीक्षक सचिन निकम यांनी घटनास्थळी पाहणी केली. त्यानंतर उपविभागीय अधिकारी रवींद्र दौडकर व निरीक्षक सरिता चव्हाण यांनीदेखील घटनास्थळी भेट दिली. पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत.





# कर्जत आगारासाठी पाच नवीन 'लालपरी'

## एसटीने अनेकांचे जीवन घडविले –आमदार थोरवे

**कर्जत, नेरळ : प्रतिनिधी**

पूर्वी एसटी हेच प्रवासाचे मुख्य साधन होते. एसटी बस केवळ प्रवासाचे साधन नसून तिने अनेकांचे जीवन घडविले आहे, असे प्रतिपादन आमदार महेंद्र थोरवे यांनी शनिवारी (दि. १४) कर्जत येथे केले.

परिवहन खात्याकडून कर्जत आगारासाठी पाच नवीन लालपरी एसटी बस आल्या आहेत. या एसटी बसच्या लोकार्पण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते सुनील जंगम यांनी विधिवत पूजा करून घेतली. त्यानंतर फित कापून पाच एसटी बसचे लोकार्पण करण्यात आले.

या कार्यक्रमास विभाग नियंत्रक दीपक घोडे, आगार व्यवस्थापक देवानंद मोरे, वाहतूक निरीक्षक दीपक देशमुख, सहाय्यक वाहतूक निरिक्षक महादेव पालवे, वसंत बागुल, लेखकार अंकुश राठोड, अभिषेक सुर्वे, रोहित विचारे आदी उपस्थित होते. आमदार थोरवे यांनी उपस्थितांच्या समवेत एसटीमध्ये बसून प्रवास केला आणि १५–२० वर्षांनंतर एसटी प्रवासाचा अनुभव घेतला.

या वेळी आमदार थोरवे म्हणाले की, परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे कर्जत एसटी बसस्थानकासाठी १० नवीन गाड्यांची मागणी करण्यात आली होती. त्यापैकी पाच गाड्या आता आल्या आहेत. उर्वरित गाड्या लवकरच येतील. विश्रांतीगृहातील एसटी कर्मचारी व आगारातील कर्मचाऱ्यांसाठी नवीन दोन स्वच्छतागृह तातडीने बांधण्यात येतील. कर्जत एसटी स्टॅन्ड मी लहानपणापासून बघत आलो आहे.

आता या स्टँडचे चांगल्या प्रकारे नूतनीकरण करण्यासाठी शासनाकडून निधी उपलब्ध करून देण्यात येईल. त्याचे अंदाजपत्रक तयार करून त्याचा प्रस्ताव करण्यात येईल.

शिवव्याख्याती प्रवासी विद्यार्थीनी सायली भोसले हिने, आमदार महेंद्र थोरवे कर्जतचा कायापालट करीत आहेत. डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रवेशद्वार, विठ्ठलमूर्ती, धर्मवीर संभाजी महाराजांचे स्मारक आदी उभारून कर्जतचे वैभव वाढवले आहे, असे सांगितले.

दीपक घोडे यांनी, आम्ही आमदारांकडे १० एसटी बस उपलब्ध व्हाव्यात यासाठी मागणी केली होती. आज त्यातील पाच बस उपलब्ध झाल्या असून त्या आजच प्रवाशांच्या सेवेसाठी सुरू करण्यात येणार आहेत, असे म्हटले.

कार्यक्रमास डॉ. राजू थोरवे, किशोर कदम, दर्शन वायकर, गणेश देशमुख, हरिश्चंद्र छत्तीसकर, अतुल सोनावणे, नागेश भरकले, महेंद्र साळवी, मेघा भरकले, अनुजा सुरावकर, सुनीता फापाळे, संगीता शिरगरे, मेघा कालवणकर आदींसह चालक, वाहक, प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# कर्जत महसूल विभागातील कारकून बनला वकील!



**कर्जत** : कर्जत येथील महसूल विभागात कारकून पदावर काम करणारे अशोक नागो भगत वकील बनले आहेत. नेरळ तलाठी यांचे कारकून असलेले भगत यांनी कामाच्या व्यापातून वेळ काढत एलएलबी परीक्षा मुंबई विद्यापीठातून उत्तीर्ण होत यश मिळविले. चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याने वकिलीची सनद मिळवल्याबद्दल कर्जत तहसीलदारांकडून अभिनंदन करण्यात आले.

मुंबई विद्यापीठाच्या वकिलीच्या पदवी परीक्षेचा निकाल लागला असून यामध्ये आंबिवली गावातील अशोक भगत यांना घवघवीत यश मिळवून सनद प्राप्त केली आहे. धावपळीच्या कामातून वेळ काढत वकील होण्याचे स्वप्न ते उराशी बाळगून होते. जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यास यांच्या जोरावर त्यांनी यशाला गवसणी घातली. कर्जत तहसीलदार डॉ. धनजंय जाधव यांनी त्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# म्हसळ्यातील ११० शाळा पहिल्या दिवसाच्या आनंदोत्सवासाठी सज्ज

**म्हसळा : प्रतिनिधी**

उन्हाळी सुट्टीनंतर १६ जूनपासून म्हसळा तालुक्यातील ११० शाळांची घंटा वाजणार आहे. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना मोफत पुस्तकांचे वाटप केले जाणार आहे. पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना राज्य शासनाकडून समग्र शिक्षा अभियानाद्वारे मिळालेल्या २३ हजार ८५९ संच मोफत पुस्तकांचे वाटप जिल्हा परिषदेमार्फत म्हसळा तालुका प्राथमिक विभागात करण्यात येणार असून विद्यार्थ्यांना ही पुस्तके मोफत दिली जाणार असल्याचे गटशिक्षण अधिकारी म्हसळा रमेश चव्हाण यांनी सांगितले.

शाळेच्या पहिल्याच दिवशी तालुक्यातील ११० शाळांमध्ये प्राथमिक शिक्षण विभाग व स्थानिक शालेय व्यवस्थापन कमिटीच्या वतीने प्रवेशोत्सव तसेच स्वागतोत्सवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे म्हसळा शहरातील शालेय व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष शशिकांत उर्फ बाबू शिर्के यांनी सांगितले.

तालुक्यात जिल्हा परिषदेच्या मराठी माध्यमाच्या ७८, उर्दू माध्यमाच्या १३ अशा ९१ शाळा आणि खासगी अनुदानित १९ शाळा आहेत. शाळा प्रवेशोत्सवाचा कार्यक्रम सर्व शाळांतून १६, १७ आणि २३ व २४ जून रोजी होणार आहे. यामध्ये इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थांना मोफत पाठ्यपुस्तके वाटप, मोफत गणवेश, पायमोजे, बूट, पौष्टिक मध्यान्ह भोजन उपलब्ध करण्यात येणार आहे. या वेळी निपुण महाराष्ट्र हा उपक्रम राष्ट्रीय पातळीवरील निपुण भारत मिशनच्या धर्तीवर राबविण्यात येणार आहे.

निपुण महाराष्ट्र कृती कार्यक्रम (Nipun Maharashtra Kriya Karyakram) हा महाराष्ट्रातील शिक्षण विभागाने सुरू केलेला एक उपक्रम आहे. याचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान (FLN) विकसित करणे आहे.

विशेषतः पहिली ते तिसरीच्या मुलांमध्ये वाचन, लेखन आणि गणितासारख्या मूलभूत क्षमता वाढवण्यावर या कार्यक्रमावर विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आसल्याचे सांगण्यात आले.

# चौकचे ग्रामविकास अधिकारी एस.पी. जाधव यांची बदली



**चौक : प्रतिनिधी**

कर्तव्यदक्ष ग्रामविकास अधिकारी हे गाव परिसराच्या विकासाचे एक सारथी असतात. एस.पी. जाधव यांच्यासारखा दक्ष अधिकारी चौक ग्रामपंचायतीला लाभल्याने येथील सर्वांगीण विकास होण्यासाठी मदत झाली, असे गौरवोद्गार सरपंच रितू ठोंबरे यांनी काढले.

चौकग्रुप ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी एस.पी. जाधव यांची प्रशासकीय बदली झाली असून त्यांचा निरोप समारंभ सरपंच रितू ठोंबरे, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य व कर्मचारी यांनी आयोजित केला होता. त्या वेळी सरपंच ठोंबरे बोलत होत्या. या वेळी नवनियुक्त ग्रामपंचायत अधिकारी गणेश मोरे यांचे शाल, श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले.

सरपंच, सदस्य आणि कर्मचारी यांच्या सहकार्याने मी ग्रामपंचायत हद्दीत विकास करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. माझ्या कार्यकाळात काही चूक झाली असेल तर मला सर्वांनी मोठ्या मनाने माफ करा, असे ग्रामपंचायत अधिकारी एस.पी. जाधव यांनी सांगितले.

कार्यक्रमास उपसरपंच सुभाष पवार, निखिल मालुसरे, राजन गावडे, पूजा हातमोडे, वृषाली पोळेकर, सुवर्णा राणे, नयना झिंगे, स्वाती देशमुख यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते. या वेळी अनेकांनी ग्राम पंचायत अधिकारी जाधव यांचा उत्कृष्ट अधिकारी म्हणून उल्लेख केला.

# बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

## संकष्ट चतुर्थीला अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीत फुलला भक्तीचा मळा

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

संकष्ट चतुर्थीनिमित्त अष्टविनायक तीर्थक्षेत्र पाली येथे बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी शनिवारी (दि. १४) भाविकांनी मोठी गर्दी केली होती. त्यामुळे मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते. भाविकांमुळे येथील हॉटेल व्यावसायिक व दुकानदारांचाही धंदा चांगला झाला. दुसऱ्या शनिवारची सुट्टी तसेच उन्हाळी सुट्टी अजून असल्याने अनेक जणांनी सुट्टी संपण्याआधी श्री बल्लाळेश्वराचे दर्शन घेतले.





पाली येथे बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रभरातून भाविक दाखल झाले होते. काही भाविक विविध वाहनांनी आले, तर काही भाविकांनी पायी दिंडी आणली होती. दरम्यान, संकष्ट चतुर्थी निमित्त मंदिराला विद्युत रोषणाई व आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. मंदिरात व मंदिराबाहेर सुबक रांगोळ्यादेखील काढल्या गेल्या होत्या.

मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजल्याचे दिसून आले. भाविकांच्या सोयीसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती.

परिसरातील हॉटेल, खेळण्यांची, शोभिवंत वस्तूंची आणि खाऊची दुकाने, नारळ, हार, फुले, पापड व मिरगुंड विक्रेते, सरबतवाले, प्रसाद व पेढेवाले आदींचा धंदा चांगला झाला. भाविक व पर्यटकांच्या वाहनामुळे पालीत काही ठिकाणी वाहतूक कोंडी झाली होती, मात्र नाक्यावर तैनात असलेले वाहतूक पोलीस तसेच पूर्ण वेळ बल्लाळेश्वर मंदिर ट्रस्टचे सुरक्षा रक्षक वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न करीत होते.

**बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने भाविकांसाठी अद्ययावत सोयीसुविधा व व्यवस्था करण्यात आल्या आहेत. त्यामुळे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची कुठल्याही प्रकारची गैरसोय होत नाही. अत्यल्प दरात प्रसादाची सोय आहे. दोन मोफत पार्किंग आणि दोन भक्त निवासदेखील आहेत. त्यामुळे भाविकांची कुठलीही गैरसोय होत नाही.**

**–जितेंद्र गद्रे, अध्यक्ष, बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्ट, पाली**

**दुसरा शनिवार तसेच उन्हाळी सुट्टी अजून बाकी असल्याने संकष्ट चतुर्थीनिमित्त बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. आलेल्या भाविकांनी वेगवेगळ्या प्रकारची खरेदीदेखील केली. त्यामुळे व्यवसाय चांगला झाला.**

**–मनोहर मोरे, दुकानदार, पाली**


## दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. पनवेल

४७१ कापड बाजार, टिळक रोड, पनवेल - ४१० २०६, जि. रायगड
ईमेल आयडी - panvel_urban65@rediffmail.com /panvelurban0065@gmail.com

### ई-लिलाव विक्री सूचना

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार यांनी बँकेचे प्राधिकृत अदिकारी म्हणून, सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन्स ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमन, २००२ च्या नियम ३ सह वाचावयाच्या कलम १३ (१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील कर्जदार/गहाणवटदारांना मागणी सूचना जारी करून त्यांना सदर सूचनेमध्ये उल्लेखित थकीत देय रक्कम परतावा करण्याची मागणी केली होती. तथापि, कर्जदार/गहाणवटदार, सदर देय रक्कम परतावा करण्यास अयशस्वी ठरल्याने, निम्नस्वाक्षरीकार यांनी सदर नियमांच्या नियम ८ सह वाचावयाच्या सदर कायद्याच्या कलम १३(४) आणि १४ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तांचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.

| अ. क्र. | कर्जदार/जामीनदार/ गहाणवटदाराचे नाव | मालमत्तेचे वर्णन (लिलाव करण्यात येणाऱ्या) | मागणी सूचनेचा दिनांक आणि थकबाकी रक्कम | निश्चित राखीव किंमत | राखीव किंमतीच्या ५% ईएमडी रु. | पाहणीचा दिनांक आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सौ. कमला गुरुनाथ पाटील (कर्जदार) श्री. लहू विठ्ठल पाटील (कर्जदार) श्री. दीपक गुरुनाथ पाटील (कर्जदार) श्री. विक्रम जोमेश ठाकूर (जामीनदार) श्री. ओमकार गुरुनाथ पाटील (जामीनदार) | श्री. लहू विठ्ठल पाटील आणि श्री. दीपक गुरुनाथ पाटील यांच्या नावे असलेली सदनिका क्र. ००१, तळमजला, बी-विंग, लोटस सीएचएस, प्लॉट क्र ४१, सेक्टर १ई, कळंबोली, ता.-पनवेल, जि.- रायगड क्षेत्रफळः ५६.४ चौ.मी. | १९.०३.२०२४ आणि २९.०२.२०२४ रोजीनुसार रु. ४९,६०,२८०/- अधिक ०१.०३.२०२४ पासूनचे त्यावरील व्याज | रु. ५८,७८,६००/- (ज्याखाली कोणताही प्रस्ताव स्वीकारण्यात येणार "नाही". | रु. २,९३,९३०/- (रुपये दोन लाख त्र्याण्णव हजार नऊशे तीस मात्र) | २१.०६.२०२५ स. ११.०० ते दु. ०२.०० दरम्यान |

वरील उल्लेखित संपत्ती/मालमत्तांच्या ई-लिलाव विक्री (सरफैसी कायदा २००२ च्या अटी आणि शर्ती आणि त्याअंतर्गत नियमनांनुसार) करिता जाहीर सूचनेच्या पुढे, दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. सदर मालमत्तांकरिता "जसे आहे जेथे आहे तत्त्वावर" आणि "जसे आहे जे आहे तत्त्वावर" फक्त ई-लिलावाद्वारे प्रस्ताव आमंत्रित करीत आहेत.

**लिलाव विक्रीच्या अटी आणि शर्ती खालील प्रमाणे आहेतः-**

१. ई-लिलाव **'जसे आहे जेथे आहे तत्त्वावर' आणि 'जसे आहे जे आहे तत्त्वावर', 'तेथे जे आहे' आणि 'कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर'** आयोजित करण्यात येईल आणि "ऑफलाईन" करण्यात येईल.

२. "श्री. लहू विठ्ठल पाटील आणि श्री. दीपक गुरुनाथ पाटील यांच्या नावे असलेली सदनिका क्र. ००१, तळमजला, बी-विंग, लोटस सीएचएस, प्लॉट क्र ४१, सेक्टर १ई, कळंबोली क्षेत्रफळ ५६.४ चौ.मी. मु.- सेक्टर १ ई, कळंबोली, ता.-पनवेल, जि.- रायगड या स्थावर मालमत्तेच्या खरेदीकरिता प्रस्ताव" असे उपरोल्लेखित केलेल्या मोहोरबंद पाकिटामधून प्रस्ताव सादर करावयास हवा आणि संभाव्य बोलीदारांनी सदर प्रस्तावाचे मोहोरबंद पाकिट खाली उल्लेखिलेल्या ठिकाणी २७ जून, २०२५ रोजी सायं. ५.०० वाजता किंवा त्यापूर्वी आणावा/पाठवावा आणि ईएमडी रक्कम दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. यांच्या नावे मुंबई येथे देय असलेल्या डिमाण्ड ड्राफ्टद्वारे भरावी.

३. निम्नस्वाक्षरीकारांना अशा पद्धतीने प्राप्त झालेले प्रस्ताव **दि. ३०.०६.२०२५** रोजी उपरोल्लेखित ठिकाणी **स. ११.००** वाजता उघडण्यात आणि विचारात घेण्यात येतील.

४. निम्नस्वाक्षरीकार यांनी कोणताही प्रस्ताव स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे आणि/लिलाव सुधारित ते रद्द करण्याचे आणि/किंवा पुढे ढकलण्याचे त्यांचे अधिकार राखून ठेवले आहेत.

५. ई-लिलाव विक्री सरफैसी कायदा/नियमन २००२ मध्ये विहीत शर्ती आणि त्याअंतर्गत/वेबसाईटमध्ये उल्लेखित अटी आणि शर्तींच्या, तसेच इच्छुक/सहभागी होणाऱ्या बोलीदारांद्वारे सादर करावयाच्या प्रस्ताव/बोली दस्तावेजांमधील शर्तींच्या अधीन आहे.

६. उपरोल्लेखित मालमत्ता वर उल्लेखिलेल्या राखीव किंमतीच्या खाली विक्री करण्यात येणार नाहीत.

७. यशस्वी बोलीदार/रांच्या बाबतीत सदर ठेव/वी समायोजित करण्यात येतील, अन्यथा परत करण्यात येतील. सदर इसारा रक्कम अनामत/तींवर कोणतेही व्याज देण्यात येणार नाही.

८. जर यशस्वी बोलीदार भरणा करण्यास अयशस्वी ठरल्यास किंवा मोहोरबंद निविदा/लिलावाच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यास कशाही प्रकारे अयशस्वी ठरल्यास, याआधीच जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल आणि जप्त केलेल्या रकमेवर त्याचा/तिचा कोणताही दावा नसेल.

९. उपरोल्लेखित इसारा रक्कम अनामत (ईएमडी) सह प्रस्ताव मुंबई येथे देय दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. यांच्या नावे मुंबई येथे देय डीडी/पे ऑर्डरद्वारे दि. २७ जून, २०२५ रोजी सायं. ०५.०० पूर्वी पॅन कार्ड आणि (आधार कार्ड) पत्त्याचा पुरावा समाविष्ट असलेल्या केवायसी दस्तऐवजांच्या स्कॅन केलेल्या प्रतींसह सेवा प्रदात्यास सादर करावी.

१०. निविदा उघडल्यानंतर, इच्छुक बोलीदार ज्यांनी राखीव किंमतीच्या खाली नसलेल्या त्यांच्या बोली सादर केल्या आहेत त्यांना प्राधिकृत अधिकाऱ्याच्या संपूर्ण अखत्यारीमध्ये बोली रक्कम वाढविण्याची संधी देण्यात येईल.

११. किमान बोली विस्तार रक्कम रु. १०,०००/- (रुपये दहा हजार) आहे.

१२. यशस्वी बोलीदार/रांनी विक्रीच्या संदर्भात प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे प्रस्ताव स्वीकारल्यानंतर लगेचच, याआधीच भरलेली ईएमडी समायोजित करून, विक्री किंमतीच्या रकमेची २५% जमा करावी, असे न केल्यास जमा केलेली इसारा रक्कम जप्त करण्यात येईल. शिल्लक विक्री किंमतीच्या ७५% रक्कम प्राधिकृत अधिकाऱ्याच्या संपूर्ण अखत्यारीमध्ये विक्रीच्या मंजुरीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत देय आहे. जर विहीत कालावधीमध्ये शिल्लक रक्कम जमा करण्यात न आल्यास, जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल. प्राधिकृत अधिकाऱ्याने यशस्वी बोलीदारास जप्तीची पुढील सूचना देणे आवश्यक नाही.

१३. बोलीदार "कॅव्हेट एम्प्टर" (खरेदीदार सावधान) या तत्त्वाने बांधील आहेत आणि फर्म किंवा सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही भार, वैधानिक दायित्वे, मालमत्ता कराची थकबाकी, आयकर, उत्पादन शुल्क, कामगार देणी, वीज आणि देखभाल देणी इत्यादी शोधण्यासाठी त्यांची योग्य ती तपासणी करण्याचा सल्ला दिला जात आहे. यशस्वी बोलीदारांनी सर्व जावके म्हणजेच महापालिका कर, देखभाल/संस्था शुल्क, वीज शुल्क, पाणी शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क (जर लागू असल्यास), जर असल्यास आणि संबंधित मालमत्तांशी संबंधित विक्री किंमतीव्यतिरिक्त सर्व जावके समाविष्ट असलेले इतर प्रासंगिक शुल्क, खर्च भरावयाचे आहेत.

१४. यशस्वी बोलीदारांनी विक्री प्रमाणपत्रावर देय नोंदणीकरण शुल्क, मुद्रांक शुल्क, कर, तारण मालमत्ता त्याच्या/तिच्या नावे हस्तांतरित करून घेण्याकरिता कोणतेही अन्य शुल्क यांसारखे प्रभार/शुल्क भरावयाचे आहेत.

१५. विक्री प्रमाणपत्र फक्त यशस्वी बोलीदाराच्या नावेच आणि फक्त संपूर्ण/विक्री किंमत प्राप्त झाल्यानंतरच पारित करण्यात येईल.

१६. कर्जदार, गहाणवटदार आणि जामीनदारांना याद्वारे सूचना देण्यात येते की, ते ई-लिलाव विक्रीच्या अटी आणि शर्तींनुसार, वरील उल्लेखित मालमत्ता खरेदीकरिता इच्छुक खरेदीदार/ग्राहक सोबत आणू शकतात.

१७. वरील सदर मालमत्तांची पाहणी पूर्व परवानगीवर आधारीत आणि प्राधिकृत अधिकाऱ्याच्या सोयीनुसार देण्यात येईल.

१८. प्राधिकृत अधिकारी उच्चतम प्रस्ताव किंवा आणि सर्व प्रस्ताव स्वीकारण्यास बांधिल नाहीत आणि कोणतेही कारण न दर्शविता कोणतीही किंवा सर्व निविदा स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे हक्क राखून ठेवीत आहेत.

१९. दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. वरील उल्लेखित मालमत्तांवर प्रलंबित असलेल्या कोणत्याही दायित्वांकरिता जबाबदार नाही. मालमत्तेचा **'जसे आहे जेथे आहे' आणि 'जसे आहे जे आहे', 'तेथे जे आहे'** आणि 'कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर' लिलाव करण्यात येईल.

२०. दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि, कोणतेही कारण न दर्शविता किंवा पूर्व सूचनेशिवाय निविदा विक्री/लिलाव रद्द करण्याचा/स्वीकारण्याचा/फेटाळण्याचा/बदलण्याचा/सुधारणा करण्याचा/पुढे ढकलण्याचा हक्क राखून ठेवीत आहेत.

२१. प्राधिकृत अधिकाऱ्याच्या सर्वोत्तम ज्ञान आणि माहितीनुसार, मालमत्तेवर कोणताही भार अस्तित्वात नाही. दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.स विक्री अंतर्गत असलेल्या मालमत्तेच्या संदर्भातील कोणताही प्रभार, धारणाधिकार किंवा भार, मालमत्ता कर, किंवा शासन किंवा अन्य कोणाचीही अन्य कोणतीही देणी याकरिता जबाबदार धरता येणार नाही.

२२. विक्री दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.च्या मंजुरीच्या अधीन आहे.

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.**

**ठिकाणः पनवेल, जि. रायगड**
**दिनांकः १३.०६.२०२५**

# द. आफ्रिकेने डब्ल्यूटीसी ट्रॉफी जिंकली

## ■ मार्करमचे धमाकेदार शतक

**लंडन : वृत्तसंस्था**

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२५च्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियाचा पराभव करत २७ वर्षांनी पहिल्यांदाच आयसीसी स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. २८२ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना सलामीवीर एडन मार्करमचे धडाकेबाज शतक (१३६) आणि कर्णधार टेम्बा बवुमाचे झुंजार अर्धशतक (६६) यांच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेने 'कांगारूं'चा पाच गडी राखून पराभव केला.



दक्षिण आफ्रिकेने १९९८मध्ये त्यांचे एकमेव आयसीसी जेतेपद जिंकले होते. त्यानंतर २७ वर्षांचा दुष्काळ संपवत आफ्रिकेने आयसीसी ट्रॉफीवर आपले नाव कोरले. या विजयासह कर्णधार बवुमाने एकही कसोटी सामना न हरण्याचा आपला विक्रम कायम राखला.

पहिल्या डावात ऑस्ट्रेलियाने २१२, तर आफ्रिकेने केवळ १३८ धावा केल्या होत्या. दुसऱ्या डावात मिचेल स्टार्कच्या झुंजार अर्धशतकाच्या बळावर ऑस्ट्रेलियाने २०७ धावा केल्या आणि आफ्रिकेला २८२ धावांचे आव्हान दिले. या आव्हानाचा पाठलाग करताना रायन रिकल्टन (६) आणि वियान मुल्डर (२७) झटपट बाद झाले. त्यानंतर एडन मार्करम आणि टेम्बा बवुमा जोडीने मैदानात पाय रोवले आणि 'कांगारूं'ची गोलंदाजी झोडपून काढली. या दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी १४७ धावांची भागीदारी केली. बवुमा दुखापतग्रस्त झाला असूनही त्याने पाच चौकारांसह ६६ धावांची दमदार खेळी केली.

चौथ्या दिवसाचा खेळ सुरू होताच टेम्बा बवुमा बाद झाला, पण एडन मार्करमने एक बाजू लावून धरली. मार्करमने संयमी खेळी करत २०७ चेंडूंचा सामना करत १३६ धावांची विक्रमी खेळी केली. त्याने आपल्या दमदार खेळीत कसोटी क्रिकेटला साजेशी फटकेबाजी केली. एकही चेंडू बेजबाबदारपणे हवेत खेळला नाही. १४ चौकारांच्या फटकेबाजीने मार्करमने आपली खेळी सजवली. विजयाला अवघ्या १० धावा शिल्लक असताना मार्करम बाद झाला. अखेर डेव्हिड बेडिंगहॅमने (नाबाद २१) चौकार लगावत आफ्रिकेला विजेतेपद मिळवून दिले.

# विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत सुरूची सिंहची 'सुवर्ण' हॅट्ट्रिक

**म्युनिक : वृत्तसंस्था**

भारताची १९ वर्षीय नेमबाज सुरूची सिंह हिने १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात सातत्यपूर्ण कामगिरीसह विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत सलग तिसऱ्या सुवर्णपदकाची कमाई केली. यंदाच्या विश्वचषक हंगामात सुरूचीने ब्युनोस आयर्स आणि लिमा येथील स्पर्धेतही सोनेरी यश संपादन केले होते. आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत वैयक्तिक प्रकारात सुरूचीचे हे चौथे सुवर्णपदक ठरले.



म्युनिकमध्ये सुरूचीने २४१.१ गुणांचा वेध घेतला. अंतिम फेरीत सुरुवातीला चीनची कांस्यपदक विजेती कियानक्सुन याओ (२२१.७) हिला मागे टाकल्यानंतर सुरूचीने लक्ष्यभेदात अचूकता राखून १०.५ गुणांसह आघाडी घेतली. विजेतेपदासाठी सुरूचीला ही अचूकता खूप महत्त्वाची ठरली. तिने फ्रान्सच्या कॅमिल जेड्रझेवस्कीला (२४१.७) मागे टाकले. या मोठ्या आघाडीमुळे अखेरच्या संधीला ९.५ गुणांचा वेध घेऊनही सुरुचीच्या विजेतेपदाला धक्का बसला नाही. कॅमिलने अखेरच्या संधीला ९.८ गुणांचा वेध घेतला.

सुरूचीने 'सुवर्ण' कामगिरी करताना सलग तिसऱ्यांदा ऑलिम्पिकमधील दोन पदकविजेत्या मनू भाकरवर वर्चस्व राखले. पात्रता फेरीत सुरुची ५८८ गुणांसह दुसऱ्या स्थानावर राहिली. मनू ५७४ गुणांसह २५व्या स्थानावर राहिली. विशेष म्हणजे अंतिम फेरीदरम्यान मनूने समालोचकाची भूमिका बजावताना सुरूचीचे कौतुक केले.

# 'बनी हॉप' झेल ठरणार बेकायदेशीर; मेरीलबोन क्रिकेट क्लबकडून नियमात बदल

**सिडनी : वृत्तसंस्था**

क्रिकेटमध्ये बाउंड्रीजवळ घेतले जाणारे कॅच नेहमीच रोमांचक आणि सामन्याचे चित्र बदलणारे ठरले आहेत. टी-२० विश्वचषकातील सूर्यकुमार यादवचा कॅच असो वा बीबीएलमध्ये मायकल नेसरचा हैराण करणारा प्रयत्न या कॅचमुळे प्रेक्षकांनी श्वास रोखून धरला होता, पण आता अशा प्रकारच्या 'बनी हॉप' कॅचवर मर्यादा येणार आहे. क्रिकेटच्या नियमांचे रक्षण करणाऱ्या मेरीलबोन क्रिकेट क्लब (एमसीसी)ने बाउंड्रीजवळील फील्डिंगसंदर्भात मोठा बदल जाहीर केला आहे.



एमसीसीने नियम १९.५.२मध्ये सुधारणा केली आहे. बाउंड्रीजवळ हवेतील झेल कायदेशीर मानण्याच्या अटी अधिक कठोर केल्या आहेत. हा बदल १७ जूनपासून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये लागू होणार असून ऑक्टोबर २०२६ पासून एमसीसीच्या अधिकृत नियमपुस्तिकेत समाविष्ट होईल. सीमारेषेवरील खेळाडू हवेतील चेंडूला सीमारेषेच्या आत असताना उडवत असत, मग सीमारेषा पार करून हवेत उडवत आणि सीमारेषेच्या आत येऊन पुन्हा झेल घेत, पण आता असे झेल अवैध मानले जातील आणि फलंदाजाला धावा मिळतील. याशिवाय जर एखाद्या खेळाडूने सीमारेषेच्या बाहेर जाऊन हवेत उडी मारून चेंडू आत फेकला आणि दुसऱ्या खेळाडूने झेल पूर्ण केला, तर तो तेव्हाच वैध मानला जाईल, जेव्हा चेंडू उडवणारा खेळाडूही सीमारेषेच्या आत असेल. चेंडू वारंवार हवेत उडवून घेतलेले झेल अवैध मानले जातील.

या नवीन नियमाच्या अंमलबजावणीनंतर २०२३मध्ये बीबीएल दरम्यान मायकेल नेसर आणि २०२०मध्ये मॅट रेनशॉच्या मदतीने टॉम बँटन यांनी घेतलेले झेल वैध मानले जाणार नाहीत. आयसीसीने या संदर्भात त्यांच्या सदस्य मंडळाला एक नोट पाठवली आहे, ज्यामध्ये म्हटले आहे की सध्याच्या नियमांनुसार काही झेल पाहिले गेले होते, परंतु या नियमामुळे काही असामान्य दिसणाऱ्या झेलांनाही वैध मूल्ये देण्यात आली होती.

### आयसीसीनेही घेतला आढावा

नेसरने घेतलेल्या झेलचा संदर्भ देत एमसीसीने म्हटले आहे की, क्षेत्ररक्षकाने सीमारेषेच्या आत झेल पूर्ण करण्यापूर्वी बनी हॉप केला. त्यावेळच्या नियमांनुसार ते योग्य असले तरी असे दिसून आले की क्षेत्ररक्षकाने प्रत्यक्षात अनेक वेळा सीमारेषेच्या बाहेर पाऊल ठेवले होते. या दोन्ही घटनांमुळे एका नवीन वादाला जन्म मिळाला, त्यानंतर आयसीसी आणि एमसीसीला त्यांच्या नियम १९.५.२चा आढावा घ्यावा लागला.

# केविन पीटरसनची भावनिक पोस्ट

**लंडन : वृत्तसंस्था**

गुजरातहून लंडनसाठी रवाना झालेले एअर इंडियाचे विमान अहमदाबादमधील मेघानी नगर परिसरात कोसळले. या दुर्घटनेनंतर इंग्लंडचा माजी क्रिकेटपटू केविन पीटरसन यांनी भावनिक पोस्ट शेअर केली. जीवन खूप मौल्यवान आहे, त्यामुळे आपल्या प्रियजनांवर प्रेम करा, असे त्याने सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

अहमदाबाद विमान अपघातानंतर पीटरसनने एक्स हँडलवरून एक भावनिक पोस्ट केली. भारतात झालेल्या विमान दुर्घटनेबद्दल मी जितके जास्त वाचतो, तितकेच मला वाईट वाटते आणि सर्व प्रवाशांसाठी आणि त्यांच्या प्रियजनांसाठी खूप दुःख होते. जीवन खूप मौल्यवान आहे. तुमच्या प्रियजनांवर प्रेम करा, असे पीटरसनने पोस्टमध्ये म्हटले आहे.

# श्रीवर्धन कोळेवाडीच्या कृष्णा गोसावीने द. आफ्रिकेत पूर्ण केली खडतर धाव

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धनमधील कोळेवाडी गावचा सुपुत्र कृष्णा यशवंत गोसावी याने अफाट जिद्द, चिकाटी आणि अपार मेहनतीच्या जोरावर आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव उज्ज्वल केले आहे. त्याने दक्षिण आफ्रिकेतील डोंगराळ भागातून चढ-उतारांनी भरलेल्या खडतर मार्गावरून पार पडणारी ९० किलोमीटरची धावस्पर्धा यशस्वीरित्या पूर्ण केली.



सुमारे १० तास ३२ मिनिटे हा कठीण प्रवास होता. यात फक्त धावण्याचे कौशल्य नव्हे, तर मानसिक ताकद, शारीरिक सहनशक्ती आणि अपार जिद्द यांची कसोटी लागते. हजारो स्पर्धकांमधून हा टप्पा पूर्ण करणे ही केवळ वैयक्तिक विजयाची गोष्ट नसून ही संपूर्ण समाजासाठी प्रेरणा ठरणारी घटना आहे.

या यशाबद्दल समस्त ग्रामस्थ मंडळ, कोळेवाडी व शिंदेवाडीतर्फे कृष्णा गोसावी याचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# इंग्लंडविरुद्ध मालिकेपूर्वी भारताच्या अपुऱ्या सरावाची प्रशिक्षकाला चिंता

**बेकनहॅम : वृत्तसंस्था**

इंग्लंडविरुद्धच्या बहुचर्चित पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेला सुरुवात होण्यास केवळ आठवड्याभराचा कालावधी शिल्लक असताना भारतीय संघाच्या अपुऱ्या सरावाविषयी गोलंदाजी प्रशिक्षक मॉर्ने मॉर्केलने चिंता व्यक्त केली आहे तसेच इंग्लंडमधील लहरी वातावरणात वेगवान गोलंदाजांना मदत मिळते, मात्र परिस्थिती अनुकूल असताना वाहवत न जाणे आणि चेंडूवर नियंत्रण राखणे हेच गोलंदाजांसमोरील मोठे आव्हान असेल, असेही मॉर्केल म्हणाला.



भारतीय संघ सध्या इंग्लंडच्या दौऱ्यावर असून २० जूनपासून पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. रोहित शर्मा, विराट कोहली आणि रविचंद्रन अश्विन या अनुभवी त्रिकुटाच्या निवृत्तीमुळे कसोटी संघाला आता युवा शिलेदारांवर अवलंबून राहावे लागणार आहे. संक्रमणातून जात असलेल्या या संघाचे नेतृत्व शुभमन गिलकडे सोपविण्यात आले आहे. भारतीय संघ केवळ एक 'इंट्रास्क्वॉड' अर्थात आंतरसंघीय सराव खेळून इंग्लंडविरुद्ध मालिकेत उतरणार आहे. यशस्वी जैस्वाल, साई सुदर्शन आणि नितीश कुमार रेड्डी यांसारखे काही खेळाडू प्रथमच इंग्लंडमध्ये कसोटी सामना खेळणार आहेत.

या पार्श्वभूमीवर गोलंदाजी प्रशिक्षक मॉर्ने मॉर्केल म्हणाला की, आमच्या काही खेळाडूंनी लाल चेंडूने फारसा सराव केलेला नाही. याची थोडी काळजी वाटत आहे. इंग्लंडमध्ये खेळताना केवळ कामगिरीत नाही, तर सरावादरम्यान आणि मैदानाबाहेरही तुम्हाला सातत्य राखावे लागते. आपल्याला सर्वोत्तम कामगिरी करण्यासाठी काय महत्त्वाचे आहे याचा प्रत्येकाने विचार करायला हवा.

### कसोटीतील खेळपट्ट्या भिन्न

इंग्लंडमध्ये दाखल झाल्यापासून भारतीय संघाला वेगवान गोलंदाजांना अनुकूल खेळपट्ट्यांवर खेळावे लागत आहे, मात्र कसोटी मालिकेत अशा प्रकारच्या खेळपट्ट्या मिळतील याची मॉर्केलला खात्री नाही. 'सरावादरम्यान खेळपट्ट्यांकडून वेगवान गोलंदाजांना बरीच मदत मिळाली, मात्र २० जूनपासून कसोटी मालिकेला सुरुवात होईल, तेव्हा खेळपट्ट्या पूर्णपणे भिन्न असतील असा माझा अंदाज आहे. खेळपट्टी सपाट असताना गोलंदाजांची खरी कसोटी लागते. तुमचे कौशल्य आणि गुणवत्ता याची ही परीक्षा असते. तुम्ही या आव्हानासाठी तयार असले पाहिजे हेच मी आमच्या गोलंदाजांना सांगितले आहे,' असे मॉर्केल म्हणाला

### काव्या मारन लग्न करणार?

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

सनरायझर्स हैदराबादची मालकीण काव्या मारन आयपीएलपासून फेमस झालेली आहे. अनेकांची ती क्रशही बनली आहे, परंतु सध्या ती एंगेज असल्याचे कळते आहे. एका प्रसिद्ध संगीतकाराच्या ती प्रेमात आकंठ बुडाल्याच्या चर्चा चित्रपटसृष्टीत सुरू झाल्या आहेत. एवढेच नाही तर हे दोघे आता लग्नाचीही तयारी करत असल्याचे समजते.



प्रसिद्ध संगीतकार अनिरुद्ध रविचंदर आणि कलानिधी मारन यांची मुलगी काव्या मारन हे रिलेशनशिपमध्ये असल्याचा दावा एका पोस्टमध्ये करण्यात आला आहे. यामध्ये ते गेल्या दोन वर्षांपासून एकमेकांसोबत असल्याचे म्हटले आहे. आता ते त्यांचे नाते पुढे नेऊ इच्छितात असेही यात म्हटले आहे.

# वैभव सूर्यवंशीला इंग्लंड दौऱ्यासाठी मिळाल्या तीन नव्या बॅट्स

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२५मध्ये राजस्थान रॉयल्सचा सलामीवीर वैभव सूर्यवंशी याने आपल्या फटकेबाज खेळीच्या जोरावर कमी वेळात भरपूर नाव कमावले. अवघ्या १४ वर्षांच्या वैभवला भारताच्या अंडर-१९ संघातर्फे इंग्लंड दौऱ्याचीही संधी मिळाली. भारताचा हा संघ सध्या इंग्लंडमध्ये असून २७ जूनपासून मालिका सुरू होणार आहे. त्यात वैभवदेखील खेळताना दिसणार आहे. या मालिकेच्या सुरुवातीपूर्वी वैभवला तीन नवीन बॅट्स मिळाल्या आहेत.



वैभव सूर्यवंशीच्या बॅटबद्दल जी माहिती उपलब्ध आहे त्यावरून असा अंदाज लावला जातो की, प्रत्येक बॅटची किंमत ही किमान एक ते दीड लाखांच्या घरात असेल. याबद्दल अधिकृत माहिती उपलब्ध नाही, पण या बॅट्सचे एक खास वैशिष्ट्य आहे. वैभवच्या तीनही नवीन बॅट एसएस कंपनीच्या आहेत, ज्याचा फोटो त्याने त्याच्या इंस्टा स्टोरीमध्ये शेअर केला आहे.

वैभव सूर्यवंशीचा एसएस बॅटशी करार आयपीएल २०२५ दरम्यान झाला होता. इन्स्टा स्टोरीमध्ये दिसून येते की या बॅट त्याला जतीन सरीनने दिले आहेत, कारण वैभवने त्याचे आभारही मानले आहेत. यासोबतच त्याने असेही लिहिले आहे की, हे खूप छान गिफ्ट आहे.

इंग्लंडविरुद्धच्या मालिकेपूर्वी वैभव सूर्यवंशीला मिळालेल्या तीन बॅटची स्वतःची एक खासियत आहे. या तिन्ही बॅटवर वैभवचे नावदेखील लिहिलेले आहे. वैभव पहिल्यांदाच इंग्लंडच्या भूमीवर खेळणार आहे. अशा वेळी तो नव्या बॅट काय कमाल करतो हे पाहणे महत्त्वाचे आहे.

# कॅसिगो रबाडाची ऐतिहासिक कामगिरी

## लॉर्ड्सवर दुहेरी सन्मान मिळवणाऱ्या गॉर्डन ग्रीनिज यांच्याशी बरोबरी

**लंडन : वृत्तसंस्था**

लॉर्ड्सवर खेळवल्या जात असलेल्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्यातील पहिल्या डावात वेगवान गोलंदाज कगिसो रबाडाने पहिल्या डावात पाच आणि दुसऱ्या डावात चार विकेट घेतल्या. यानंतर आता सगळीकडे रबाडाच्या गोलंदाजीची चर्चा आहे. याशिवाय त्याला एक सन्मान मिळाला, जो लॉर्ड्सच्या मैदानावर कसोटी क्रिकेटच्या जवळजवळ १४१ वर्षांच्या इतिहासात फक्त वेस्ट इंडिजचे माजी सलामीवीर गॉर्डन ग्रीनिज यांना मिळाला होता.



लॉर्ड्सच्या मैदानावर शतक करणाऱ्या किंवा पाच विकेट घेणाऱ्या खेळाडूचे नाव सन्मान फलकावर सुवर्णाक्षरांनी लिहिले जाते. अलीकडेपर्यंत हा सन्मान मिळवणारे ग्रीनिज हे पहिले आणि एकमेव खेळाडू होते. आता हा सन्मान कगिसो रबाडानेदेखील मिळवला आहे.

डब्ल्यूटीसी फायनलच्या पहिल्या दिवसापूर्वी लॉर्ड्सवरील १४१ वर्षांच्या कसोटी इतिहासात गॉर्डन ग्रिनीज असे एकमेव खेळाडू होते. ज्यांचे नाव होम ड्रेसिंग रूम (इंग्लंड संघाचा किंवा होम टीमचा दर्जा प्राप्त झालेल्या कोणत्याही संघाचा ड्रेसिंग रूम) आणि अवे ड्रेसिंग रूम (विदेशी संघाचा ड्रेसिंग रूम) या दोन्ही ऑनर्स बोर्डवर लिहिले होते. १९८४मध्ये इंग्लंडविरुद्ध नाबाद २१४ धावा आणि त्यानंतर १९८८मध्ये १०३ धावांच्या खेळीमुळे ग्रीनिज यांचे नाव 'अवे ड्रेसिंग रूम'मध्ये सन्मान फलकावर सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले.

यानंतर १९८७ मध्ये मेरीलेबोन क्रिकेट क्लब (एमसीसी)कडून खेळताना रेस्ट ऑफ द वर्ल्ड इलेव्हनविरुद्ध ग्रीनिज यांनी केलेल्या १२२ धावांच्या खेळीमुळे त्यांचे नाव होम ड्रेसिंग रूममधील सन्मान फलकावर कोरले गेले.

आता डब्ल्यूटीसी फायनलमध्ये ऑस्ट्रेलियाच्या उस्मान ख्वाजा, कॅमेरून ग्रीन आणि ब्यू वेबस्टरसह पाच विकेट घेतल्यानंतर रबाडाचे नाव ऑनर्स बोर्डवर लिहिले गेले आहे. दक्षिण आफ्रिकेला डब्ल्यूटीसी फायनलसाठी लॉर्ड्सवर 'होम ड्रेसिंग रूम' देण्यात आला होता, तर पहिल्या डावात रबाडाने घेतलेल्या पाच विकेट्समुळे तो गॉर्डन ग्रीनिज यांच्या या क्लबमध्ये दाखल झाला आहे.

यापूर्वी २०२२मध्ये लॉर्ड्सवर इंग्लंडविरुद्ध कागिसो रबाडाने ५२ धावांत पाच विकेट घेतले होते. या कामगिरीमुळे त्याचे नाव अवे ड्रेसिंग रूमच्या (विदेशी संघाच्या ड्रेसिंग रूम) सन्मान बोर्डवर लिहिले होत. आता रबाडा लॉर्ड्सवर आणखी एकदा पाच विकेट्स मिळवत १४१ वर्षांच्या इतिहासात या दोन्ही बोर्डवर आपले नाव असणारा दुसरा खेळाडू ठरला आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com